|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ | अंक : १५+१६ | सोमवार दि. ०८ एप्रिल २०२४ ते रविवार दि. १४ एप्रिल २०२४ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड




## फुटीरांवर भाजपवाल्यांनी अचूक साधला नेम तिकीट वाटपात केला शिंदे-अजितदादांचा गेम

मुंबई/सोनू जाधव

राजकारणात गद्दारी काही नवी नाही आणि बेरजेच्या राजकारणात सरशी तिकडे फारशी असा हिशोब असतो. त्यामुळे भ्रष्टाचाराच्या प्रकरणात गुंतलेले लोक सत्तेच्या आश्रयाला जातात. जेणेकरून आपल्यावर कारवाई होऊ नये... दिड वर्षा पूर्वी शिवसेना आणि राष्ट्रवादीतील काही आमदार आपल्या पक्षाशी विश्वासघात करून भाजप सोबत गेले होते. भाजपने त्यांना सत्तेचे गाजर दाखवले होते. तसेच आगामी निवडणुकीत उमेदवारी देण्याचे आश्वासन दिले होते. त्यामुळे शिवसेना, राष्ट्रवादीतील फुटीरांनी भाजपवर विश्वास ठेवला. पण भाजपाची विश्वासहर्ता काय आहे ते संपूर्ण देशाने पहिले आहे. शिवसेना व राष्ट्रवादीतील फुटीरांना काही प्रमाणात सत्तेत वाटा मिळाला. पण लोकसभा निवडणुकीत त्यांच्या तोंडाला पाने पुसण्यात आली. शिंदे गटाच्या ५ सिटींग खासदारांचे तिकीट कापण्यात आले. हा सरळ सरळ विश्वासघात आहे. पण शिंदेंचे हात आता दगडाखाली आहेत. त्यामुळे ते काहीच करू शकत नाहीत. कारण शिवसेनेतून फुटल्यावर त्यांनीच सांगितले होते कि भाजप एक महाशक्ती आहे. त्याच महाशक्तीने आता शिंदेंना इंगा दाखवला आहे. त्यामुळे शिंदे काहीच बोलू शकत नाहीत.




ज्या खासदारांचे तिकीट कापण्यात आले त्यातील भावना गवळी या ५ वेळा वाशीम-यवतमाळ मतदार संघातून निवडून आल्यात. तर हेमंत गोडसे हे सुद्धा विद्यमान खासदार आहेत. हिंगोलीचे हेमंत पाटील यांनाही असेच डावलण्यात आले. या खासदारांनी त्यांच्या कार्यकाळात त्यांच्या मतदार संघात चांगली कामे केलीत तरीही त्यांना डावलण्यात आले. याचा अर्थ एकाच शिंदे गटाची ज्याज्या मतदार संघात ताकत आहे ती टाकत कमी करायची आणि तिथे शत प्रतिशत भाजपाची टाकत निर्माण करून शिवसेनेतून फुटलेल्यांचा परस्पर काटा काढायचा. तोच प्रकार राष्ट्रवादीतून फुटलेल्यांच्या बाबतीत करायचा. जेणेकरून महायुतीत सामील असलेले शिंदे गट आणि अजित पवार गट वरचढ होणार नाहीत. त्यांना महायुतीत इतके कमजोर करायचे कि भविष्यात भाजपाला विरोध करण्याची त्यांच्यात ताकतच रहाणार नाही. हाच आहे भाजपचा बामणी कावा आणि त्याला शिवसेना आणि राष्ट्रवादीतील गद्दार फासलेत आता इकडे आड आणि तिकडे विहीर अशी त्यांची अवस्था झाली आहे.

महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागा आहेत. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत शिवसेना भाजपाची युती होती. त्यामुळे भाजपाला २३ तर शिवसेनेला १८ जागा मिळाल्या होत्या. राष्ट्रवादीला ५ तर काँग्रेस व एमआयएमने १ जागा जिंकली होती. हे गणित पाहता भाजपने त्यांच्या जागा बरोबर स्वतःकडे ठेवल्या पण शिवसेनेतून फुटून भाजप सोबत आलेल्या शिंदेंच्या शिवसेनेच्या जागांवर मात्र डल्ला मारण्याचा प्रयत्न चालवला आहे. आज शिंदेंची शिवसेनाच अधिकृत शिवसेना असल्याचे निवडणूक आयोगाने जाहीर केले. शिवसेनेचे धनुष्यबाण हे चिन्ह आणि शिवसेना हे नाव सुद्धा शिंदेंकडे आहे आणि विशेष म्हणजे शिवसेनेच्या १८ पैकी १३ खासदार शिंदे गटाकडे आहेत. त्यामुळे भाजपने जर त्यांनी जिंकलेल्या सर्व २३ जागा स्वतःकडे ठेवल्या तर मग त्याच न्यायाने ...पान २ वर

## जमिनीची माहिती सांगत गावभर फिरला मुलानेच जन्मदात्या बापाचा गळा चिरला

कासा/एस.कुमार

**ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात जमिनीचे वाद असतात. विशेष म्हणजे हे वाद नात्यातल्या लोकांमध्येच असतात. पण जे वाद प्रशासनात किंवा न्यायालयात प्रलंबित असतात त्याची माहिती बाहेर सांगायची नसते. पालघर जिल्ह्यातील सोमता-घटलपाडा गावातील डोंगरकर कुटुंबात असाच जमिनीचा वाद होता आणि तो प्रांताकडे प्रलंबित होता. मात्र या वादात आमचीच सरशी होणार कृष्ण डोंगरकर सर्वांना सांगत होते. या गोष्टीचा त्याच्या मुलाला राग आला आणि रागाच्या भरात त्याने बापाचा गळा चिरला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**




दि.९ मार्च २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजण्याचे पूर्वी डहाणूतील सोमटा - घाटाळपाडा येथे वन विभागाच्या जागेत रस्त्यापासून अंदाजे १५ फूट अंतरावर एक व्यक्ती मृताअवस्थेत आढळून आला होता. या अज्ञात इसमाच्या मानेवर धारदार हत्यारांनी खूपसून व गंभीर दुखापत करून त्याचा खून केला होता. याबाबत सोमटा गावचे पोलीस पाटील काशीराम कृष्णा डवला यांनी कासा पोलिसांना या बद्दल माहिती दिली. कासा पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर, पोउपनि संदिप नागरे, स्वप्नील सावंतदेसाई आदी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळी पडलेल्या अज्ञात व्यक्तीची बारकाईने पाहणी करून तपासणी केली असता, तो सोमा पाटालपाडा येथील रहिवासी कृष्णा रामा डोंगरकर (वय ६५) यांचा मृतदेह असल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी घटनास्थळ व मृतदेहचा पंचनामा करून, याबाबत पोलीस पाटील काशीराम कृष्णा डवला (सोमटा गावठाणपाडा ता. जि. पालघर) यांनी दिलेल्या फिर्यादी वरून कासा पोलीस ठाण्यात गु.र.नं. ७६/२०२४ भादवि सं. कलम ३०२, प्रमाणे दि.१० मार्च २०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पालघर जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अपर पोलीस अधीक्षक पंकज शिरसाट, जव्हार विभाग उपविभागीय पोलीस अधिकारी गणपत पिंगळे यांचे मार्गदर्शनाखाली कासा पोलीस ...पान २ वर

## भर रस्त्यातच घडला हत्येचा थरार लुटारूंनी केले बार कर्मचाऱ्याला ठार




नवी मुंबई/प्रतिनिधी

**वाशी आजकाल गुन्हेगारी इतकी वाढली आहे कि रात्री अपरात्री घराबाहेर पडण्याची सोय राहिलेली नाही. कारण लुटारू कधी कुठून येतील आणि एखाद्याचा जीव घेतील याचा नेम नाही. बारमध्ये काम करणारा एक तरुण आपले काम संपवून घरी जाण्यासाठी बस स्टॉपवर बसची वाट पाहत थांबला होता, त्याच्या हातात बॅग होती. याच वेळी मोटार सायकलवरून आलेल्या दोन लुटारूंनी त्याच्या हातातली बॅग हिसकावण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनी प्रतिकार करताच लुटारूं त्याच्यावर प्राणघातक हल्ला करून त्याला ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून फरारी आरोपीचा शोध घेत आहेत.**

वाशीतील जुहूगाव येथे बसची वाट पाहत ...पान २ वर

## संशयामुळे घरात होत्याचे नव्हते झाले पतीनेच पत्नीचे शीर धडावेगळे केले

गडहिंग्लज/क्राईम रिपोर्टर

**काही लोक असे असतात कि वय झाले तरी त्यांच्या मूळ स्वभावात बदल होत नाही. गडहिंग्लज जवळच्या हिटनी मधील मारुती बेळाज हा सुद्धा असाच संशयी होता. साठी उलटली घरात सुना नातवंडे आली तरी मारुती पत्नीवर संशय घ्यायचा तिला मारहाण करायचा. एके दिवशी नाश्ता उशिरा आणला म्हणून त्याने पत्नीशी भांडण केले. त्यामुळे पत्नीनेही त्याला उलट उत्तर दिले. याच गोष्टीचा राग मनात ठेवून रात्री घरी आल्यावर, टीव्ही पाहत बसलेल्या पत्नीच्या मानेवर त्याने कोयत्याने वार करून तिचे मुंडके धडावेगळे केले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**



गडहिंग्लज पासून जवळच खणदाळ येथील हिटणी वसाहतीत मारूती बेळाज हे पत्नी सुशिला मुलगा बसवराज आणि सून सुप्रियासह आपल्या शेतात राहयला आहेत. हिटणी येथील बेळाज कुंटूबाची पाच सहा घरे आहेत. तेथेच त्याची शेती आहे. मारूती याच्या शेजारीच त्याचा भाऊ चन्नाप्पा बेळाज हे देखील आपल्या परिवारासह राहयला आहेत. मारूती बेळाज याचा स्वभाव हा तसा चिडखोर आणि तापट होता. तसेच ते संशयी वृतीचे देखील होते. घरात सून, नातू आले तरी देखील ते बायको सुशिला बरोबर भांडण काढून तिच्यावर संशय घेत होते. बेळाज कुटूंबाची परिस्थीती तशी सधन होती. त्याची ऊसाची शेती असल्याने घरात कशाची काहीच कमतरता नव्हती. त्याच बरोबर मारूती बेळाज आणि त्याचा मुलगा मसवराज हे दोघे ही आपल्या शेतीबरोबरच जनवारे खरेदी विक्रीचा देखील व्यवसाय करीत होते. मारूती हे आपल्या वयाची साठी पर्यत आले होते. या वयात नातवंडाना खेळवताना देखील ते पत्नी सुशिला वर संशय घेत होते. सुरूवातीपासूनच त्यांचा संशयी स्वभाव असल्याने बायको सुशिला वर संशय घेऊन भांडण उकरून काढून तिला मारहाण करणे एवढेच त्यांना माहित होते. ...पान २ वर

## क्रिकेटच्या वादातून राडा झाला एका खेळाडूचा त्यात जीव गेला



भिवंडी/क्राईम रिपोर्टर

**सध्या देशात १७व्या आयपीएल क्रिकेट स्पर्धेचा हंगाम सुरु आहे. त्यामुळे गल्लीतल्या क्रिकेट खेळाडूंनाही चेव आला आहे. स्थानिक पातळीवर क्रिकेटचे सामने भारावले जात आहेत. भिवंडीत असेच क्रिकेटचा सामना सुरु असताना दोन गटात राडा झाला होता. याप्रकरणी एका गटाने दुसऱ्या गटातील तरुणांच्या विरोधात पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली होती, त्याचा राग मनात ठेवून ५ महिन्यांनी सूड घेण्यात आला आणि तक्रारदार गटावर प्राणघातक हल्ला करण्यात आला यात ७ जण जखमी झाले. त्यातील एकाच मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून काही आरोपींना अटक करण्यात आली असल्याचे समजते.**

भिवंडी शहरातील शांतीनगर परिसरातील केजीएन ...पान २ वर

## दोन मुलांच्या बापाच्या प्रेमात फसली विवाहित रुपाली जीव गमावून बसली

हातकणंगले/क्राईम रिपोर्टर

**शरीरसुखासाठी हपापलेली बाई तिचा पतीच काय कोणा सोबतही प्रामाणिक राहू शकत नाही. हिंगणगाव येथे रहाणारी रुपाली शेजारच्या दोन मुलांच्या बापाच्या प्रेमात पडली. त्याच्यासाठी तिने आपला पती व दोन मुलांना सोडले. मात्र त्यानेही त्याच्या पत्नीला सोडून आपल्याशी लग्न करावे. यासाठी ती त्याच्या मागे लागली होती. पण तो ऐकत नव्हता, तर ती त्याचा पिच्छा सोडत नव्हती. अखेर त्याने एके रात्री तिचा कायमचा काटा काढला व पळून गेला. पण पोलिसांनी त्याला अटक केली.**



प्रकाश शेखर हदीमणी हा मुळचा कर्नाटकातील तो सध्या हातकणंगले तालुक्यातील हिंगणगाव येथे पत्नी मुलासह राहयला आहे. प्रकाश हा सुरूवातीला मिळेल ते काम करून आपल्या घरचा प्रपंच चालवित होता. त्याला ही दोन मुले झाली. तो दोन मुलांचा बाप असला तरी तो शेजारी राहत असलेल्या रूपालीच्या प्रेमात पडला होता. त्या दोघांची सारखी नजरा नजर होत होती. तो विवाहित आणि दोन मुलाचा बाप आहे हे माहित असून ही रूपाली त्याच्यावर वेडयासारखे प्रेम करीत होती. ते दोघे ही बाहेर भेटून मजा करीत होती. ही गोष्ट ज्यावेळी रूपालीच्या घरच्या लोकांना समजली त्यावेळी त्यांनी तिचे लग्न सांगली जिल्हयातील बामणी येथे लावन दिले. कसे बसे तिच्या लग्नाला पाच वर्ष झाली. तिला ही दोन मुले झाली. तिचा संसार सुखा समाधानाचा चालला होता. परंतु या पाच वर्षाच्या दरम्यान ती ज्यावेळी हिंगणगाव येथील आपल्या माहेरी येत होती. ...पान ६ वर

## दोन कुटुंबातील वाद प्राणावर बेतला भर रस्त्यातच अमोलचा जीव घेतला

धुळे/क्राईम रिपोर्टर



**पूर्व वैमन्यस्यातून सुडाची भावना निर्माण होते आणि त्यातून एखाद्याचा जीवही जाऊ शकतो. खास करून तरुणांमधील वाद शक्यतो लवकर मिरवायचे असतात. कारण हे वाद चिघळत राहिले तर त्यातून काहीही घडू शकते. धुळ्यातील दोन कुटुंबातील वादातून अशाच एका तरुणाची हत्या करण्यात आली. धुळ्याच्या सहजीवन नगरातील गुलदगडे कुटुंब आणि मेढे कुटुंबातील हा वाद विकोपाला गेला होता. त्यातच मेढे कुटुंबातील हर्षलला गुलदगडे कुटुंबातील अमोलने मारहाण केली होती. याच मारहाणीचा बदला घेण्यासाठी मेढे कुटुंबातील तरुणांनी अमोलची निर्घृण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.**

एखादा कसाई जनावराला ज्या क्रूर पद्धतीने जीवे मारतो, त्या पद्धतीने माणसांना संपवण्याचे सत्र धुळ्यातही निर्धास्तपणे सुरू झाल्याने धुळे शहर हे आता गुन्हेगारीकरणाचे केंद्रस्थान बनू पहात आहे. गेल्या काही वर्षात धुळ्यात निर्दयीपणे ज्या हत्या करण्यात आल्या, त्यामागे बदला घेण्याचे कारण अधोरेखित झाले आहे. एकाच भागात रहाणाऱ्या दोन परिवारात सख्य होते. त्यातील एका ...पान २ वर

## अनैसर्गिक कृत्यास त्याने नकार दिला विकृतांच्या नादी लागलेल्याचा जीव गेला

अहमदनगर/क्राईम रिपोर्टर

**दारुड्यांची सांगत खूप वाईट असते. कारण काही दारुड्याना दारूच्या व्यसना बरोबरच काही विकृतीही असतात आणि अशा लोकांवर विश्वास ठेवणारा माणूस कधीतरी त्यांच्या विकृतीला बळी पडून जीव गमावून बसतो. अहमदनगरच्या नवनागपूर येथील अशाच एका घटनेत दोन दारूड्यांशी मैत्री असलेल्या एका तरुणावर त्या दोघांनी अनैसर्गिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याने विरोध करताच त्या दोघांनी त्याचा जीव घेतला. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**



आरोपी साहिल | आरोपी विशाल

कुसंगतीने अधोगतीला सुरूवात होते. एखाद्या व्यसनापायी केलेली संगत आपल्याला आणखी कोणत्या अवैध वा अनैसर्गिक संबंधात घेऊन जाणार आहे याचा काही थांगपत्ता लागत नाही. व्यसनामागून व्यसने जडत जातात आणि पाय जास्तच खोलात रूतत जातो. त्यातून बाहेर पडण्याच्या प्रयत्नात काही वेळा जीव जातो, पण व्यसनी माणसाला हे समजेपर्यत वेळ निघून गेलेली असते. अहमदनगर जिल्ह्यातील एका गृहस्थाचे असेच झाले. अवघी चाळीशी पार केलेला हा तरूण दारूचा व्यसनी होता. त्यातच पत्नीच्या निधनाने तो एकटा पडला होता. व्यसनामुळे चांगली नोकरीही सुटली. ना नोकरी, ना संसार, ना बायको, ना मूलबाळ. कशाचीही फिकीर नसलेला तो तरूण अन्य दारूड्यांच्या संगतीत आला. त्याला दोन तरूणांनी गाठले. हे दोघे अवघे २०-२२ वर्षाचे, पण अनैसर्गिक शरीरसंबंधाची ...पान ६ वर

08 TO 14 APRIL 2024 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 4/6/2024 8:05 PM Page 1



पान १ वरून...

## फुटीरांवर भाजपवाल्यांनी अचूक...

शिवसेनेच्या सर्व १३ जागा शिंदेंच्या शिवसेनेला मिळायलाच हव्यात, पण आज अशी परिस्थिती आहे. शिवसेनेने जिंकलेल्या जागांसाठी सुद्धा शिंदेंना भाजप समोर झोळी पसरावी लागत आहे. आज त्यांना शिवसेना फोडल्याचा निश्चितपणे पश्चाताप होत असेल. अरे आपण काय करायला गेलो आणि काय झाले असे आज त्यांना वाटत असेल. हा तर एक ट्रेलर आहे. पण जर का उद्या शिंदे आणि अजित पवार गटाच्या मदतीने भाजपने महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ पैकी ४५ जागा जिंकल्या तर विधानसभा निवडणुकीत शिंदे आणि अजित पवार गटावर भाजपाची भांडी घासण्याची पाळी येईल. दोन्ही गटाचे सध्या प्रत्येकी ५० ते ४० आमदार आहेत असे असतानाही विधानसभा निवडणुकीला शिंदे-अजित पवार गटाला भाजप ३०-४० जागाही देणार नाही आणि शिंदे अजितदादा यांच्या घोटाळ्यांच्या फायली भाजपाकडे असल्याने हे दोन्ही गट विरोधही करू शकणार नाहीत. आज अशी परिस्थिती आहे. शिंदेंचे सुपुत्र श्रीकांत शिंदे यांची कल्याण-डोंबिवली मतदार संघाची जागाही धोक्यात आहे. अजून त्याची घोषणा झालेली नाही. कारण भाजपचा या जागेवर डोळा आहे. जरी लास्ट मुव्हमेंटला श्रीकांत शिंदेंच्या नावाची घोषणा झाली. तरी भाजपवाले श्रीकांतचा गेम केल्याशिवाय रहाणार नाहीत. अशावेळी एकाच पर्याय आहे तो म्हणजे शिवसेना बरखास्त करून भाजपात प्रवेश करा आणि आपले राजकीय अस्तित्व टिकवा. शिंदेंची रिक्षा त्याच दिशेने चालले आहेत तर अजित पवारांच्या घड्याळात त्यांच्या पक्षाचे १२ वाजण्याची वेळ जवळ आलेली आहे. गद्दारीची शिक्षा त्यांना अशा प्रकारे मिळत असल्याचे आज संपूर्ण महाराष्ट्र बघतोय!

## जमिनीची माहिती सांगत गावभर...

ठाण्याचे प्रभारी पो.नि.नामदेव बंडगर, पोउपनि संदिप नागरे, स्वप्नील सावंतदेसाई, पालघर स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी पोनि. अनिल विभूते यांचे तपास पथक तयार करुन आरोपीला शोधून करण्याच्या सुचना दिल्या. आता पोलिसांसमोर गुन्हेगाराला शोधण्याचे मोठे आव्हान होते. पोलीस कामाला लागले. पोलिसांनी गोपनीय माहिती जमवायला सुरूवात केली. तेव्हा पोलिसांनी मयताचा कृष्णा डोंगरकर यांचा मुलगा रामदास डोंगरकर याची चौकशी सुरू केली.चौकशी करताना तो सतत घटनेचा क्रम बदलून सांगत होता.तसेच घाबरून पाणी मागत होता. तो इतका घाबरला होता की, त्याच्या अंगाला घाम फुटला होता. त्यामुळे सदर क्रूर गुन्हा रामदासनेच केला असावा असा पोलिसांना दाट संशय आला. पोलिसांना त्याच्या घराची पाहणी केली असता, घरी ताज्या शेणाने सारवलेली जमीन आढळली. त्या जागेत ठिकठिकाणी रक्त पडल्याचे दिसून आले. त्यानंतर त्याची उलटतपासणी सुरू केली असता त्याने गुन्हा केल्याची कबूली दिली ती अशी. मयत कृष्णा रामा डोंगरकर (वय ६५) आणि त्यांचा चुलत भाऊ जयराम डोंगरकर याच्याबरोबर जमिनीच्या वारसा हक्कावरून वाद सुरू आहे. सद्या हे प्रकरण प्रांत कार्यालय पालघर येथे चालू आहे. परंतु ही जमीन आपल्यालाच मिळणार असे गावभर सांगत वडील कृष्णा डोंगरकर फिरत असत. वडील आपल्या जमीन मिळू देणार नाहीत असे मुलगा रामदास व त्याचा चुलत भाऊ विलास याना वाटत होते. या गोष्टीचा राग आरोपी रामदास आणि त्याचा चुलत भाऊ विलास डोंगरकर यांना होता. या रागातूनच या दोघांनी वडील कृष्णा डोंगरकर यांचा खून करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार दिनांक ८ मार्च रोजी वडील कृष्णा हे घरात झोपले असताना, मुलगा रामदास डोंगरकर याने घरात झोपलेल्या वडिलांवर लोखंडी विळ्याने मानेवर डाव्या बाजूला गंभीर वार करीत आपल्या वडिलांची हत्या केली. सदरची घटना कोणाला माहिती पडू नये या भीतीपोटी त्याने प्रेत विलास डोंगरकर याच्या मदतीने घरातून उचलून नेऊन पुरावा नष्ट करण्याचा उद्देशाने सोमटा-घाटाळपाडा येथे वन विभागाच्या जागेत रस्त्यापासून अंदाजे १५ फूट अंतरावर फेकून दिला. अशा प्रकारे रामदास डोंगरकर आणि त्याचा चुलत भाऊ विलास डोंगरकर या दोघांनी वडील कृष्णा रामा डोंगरकर यांची हत्या केल्याची कबुली दिली. कासा पोलिसांनी रामदास कृष्णा डोंगरकर व विलास चितु डोगरकर दोन्ही रा. सोमटा घाटानपाडा ता. जि. पालघर यांना ताब्यात घेवून तात्काळ अटक करण्यात आली आहे. खुनाच्या गुन्ह्याची अवघ्या चार तासात उकल करून कासा पोलिसांना आरोपींना जेरबंद करण्यात यश आले आहे. ही कामगिरी पालघर जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अपर पोलीस अधीक्षक पंकज शिरसाट,जव्हार विभाग उपविभागीय पोलीस अधिकारी गणपत पिंगळे यांचे मार्गदर्शनाखाली कासा पोलीस ठाण्याचे प्रभारी पो.नि. नामदेव बंडगर, अनिल विभूते, पोउपनि संदिप नागरे, स्वप्नील सावंतदेसाई, रवींद्र वानखेडे, पोहवा.कैलास पाटील, दिनेश गायकवाड, संजय धांगडा, राकेश पाटील, दिपक राऊत, नरेंद्र पाटील सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, पालघर तसेच सहाय्यक फौज, आर. के. चौधरी, पोह,.राजु भोये, मनोज भोये, पोना.सुनिल गावंदा, चालक पो. ना .लोहार, श्रीयेश भोये, धूम सर्व नेमणुक कासा पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडाली आहे.

## भर रस्त्यातच घडला हत्येचा थरार...

बसलेल्या एका तरुणावर मोटारसायकलवरून आलेल्या दोन अज्ञात हल्लेखोरांनी धारधार शस्त्राने हल्ला करुन त्याची निर्घृणपणे हत्या केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. या हल्लेखोरांना पकडण्यासाठी गेलेल्या व्यक्तीवर देखील हल्लेखोरांनी शस्त्राने प्राणघातक हल्ला करुन मोटारसायकलवरुन पलायन केले आहे. वाशी पोलिसांनी या दोन्ही हल्लेखोराविरोधात हत्या तसेच हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे. मृत तरुणाचे नाव मुकेश उर्फ मंटु कुमार यादव (२६) असे असून तो कोपरखैरणे येथे राहत होता. तसेच तो वाशी जुहूगाव येथील कपिल किनारा या बारमध्ये काम करत होता. बारमधील काम संपवून मंटु कुमार यादव हा कोपरखैरणे येथील आपल्या घरी जाण्यासाठी निघाला होता. त्यासाठी तो पावणे पाच वाजण्याच्या सुमारास फिजिक्स जिमच्या बिल्डिंगमधील तळमजल्यावरील ओम सिद्धिविनायक होमीयोपेथी दुकानाच्या कट्ट्यावर बसची वाट पाहत बसला होता. याचवेळी मोटारसायकलवरून आलेल्या दोघा हल्लेखोरांनी मंटु कुमार यादव याच्या हातामधील बॅग खेचण्याचा प्रयत्न केला. मात्र मुकेशने त्याला विरोध केल्याने सदर हल्लेखोराने मंटु कुमार यादव सोबत झटापट केली. याच वेळी दुसऱ्या हल्लेखोराने त्याच्याजवळ असलेल्या धारदार शस्त्राने मंटु कुमार यादव याच्या छातीवर तसेच कपाळावर आणि हातावर वार केले. यावेळी मंटु कुमार यादव याची आरडाओरड ऐकून जुहू गावात राहणारा दिनेश जगदीश यादव (४१) हा हल्लेखोरांना पकडण्यासाठी गेला असता सदर हल्लेखोरांनी त्याच्यावर देखील शस्त्राने वार करुन त्याला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर दोघेही हल्लेखोर मोटारसायकलवरून पळून गेले. या घटनेची माहिती मिळताच वाशी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मंटु कुमार आणि दिनेश या दोघांना रुग्णालयात दाखल केले. मात्र मंटु कुमारचा रुग्णालयात दाखल करण्यापुर्वीच मृत्यू झाला. या हत्येच्या घटनेनंतर वाशी पोलिसांनी दोन अज्ञात हल्लेखोराविरोधात हत्या, तसेच हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे. झालेल्या घटनेचा अधिक तपास पोलीस करत असल्याचे झोन वन चे उपायुक्त पंकज डहाणे यांनी सांगितले आहे.

## संशयामुळे घरात होत्याचे नव्हते ...

रात्री दारू पिऊन आला की कोणत्या ना कोणत्या कारणातून भांडण करायचे आणि बायको मुलगा सून यांना त्रास करायचा हे त्याचे नेहमीचे झाले होते. मुलगा बसवराज याने ही त्यांना बऱ्याच वेळेला समजावून सांगितले तरी त्याच्या स्वभावात काहीच फरक पडला नव्हता. त्याच्या स्वभावाला खरे तर औषध नव्हते. म्हातारपणात देखील संशयी स्वभावाने ते पछाडलेले होते. त्यामुळे त्याचे घरात बायको मुलगा, सून याच्या बरोबर कधीच पटत नव्हते. गेल्या दीड महिन्यापूर्वी त्याचा ऊस कारखान्याला गेला होता. त्याचे बील देखील त्यांना जवळपास दोन अडीच लाख रूपये मिळाले होते. त्यामुळे हल्ली त्याची चैन चालली होती. दिवसभर शेतात राबायचे रात्री फुल्ल दारू पिऊन येऊन बायको मुलगा सून यांना त्रास करायचा हे नेहमीचेच झाले होते. माणसाच्या खिशात नको तितका पैसे खेळायला लागले की त्याला नको ते उदयोग सुचतात तसे मारूती याचे देखील झाले होते. नुकतेचे ऊसाचे बील कारखान्याकडून मिळाले असल्याने दारूत ते पैसे खर्च करीत होते. त्यामुळे पत्नी सुशिला त्यांना या वयात तुम्हाला कशाला असले थेर पाहिजे असे म्हणून त्यांना सांगत होती. तरीपण मारूती कोणाचे काही ऐकत नव्हते. त्यांना भांडण ऊकरून काढायला काही तरी कारण पाहिजे असल्याने ते तिच्यावरच संशय घेऊन तिलाच तु चांगली वागत नाहीस, तुझे बाहेर कोणाबरोबर तरी लफडे आहे. त्यामुळे तू मला वेळेवर जेवण नाश्ता पाणी देत नाहीस असे म्हणून तिलाच मारहाण करीत होते. त्यामुळे म्हातारपणात नवरा बायकोची नेहमीचे भांडणे म्हणजे शेजाऱ्यांना तमाशाच झाला होता. वयोमान परत्वे मारूती यांचा स्वभाव चिडखोर, आणि तापट बनला होता. नुकतीच ऊसाची लावण करायची असल्याने ते शेतात भांगलणीचे पलटी मारण्याचे काम चालू होते. त्यासाठी त्यांनी पाणी पाजून शेत ही तयार करून घेतले होते. सोमावर दि.२५ मार्च रोजी शेतात ऊसाची लावण करायची असल्याने गडी माणसांना त्यांनी बोलावून घेतले. त्यातच मुलगा आणि सून हे दोघे ही परगावी कामानिमित्य गेले असल्याने सुशिला या सकाळपासूनच घरकामात व्यस्त होत्या. शेतातच घर असल्याने त्या गडी माणसांना आणि नवऱ्याला सकाळी काम सुरू होण्याआधी चहा देऊन त्या आपल्या घरातील कामाला लागल्या. त्या कामात असताना त्यांना गडी माणसांना आणि नवऱ्याला नाश्ता दयायला वेळ झाला. याचा राग मारूतीला आला.शेतात ऊसाची लावण सुरू असताना गडी माणसा समोरच त्यांनी बायकोला नाश्ताला इतका उशिर का? म्हणून भांडण काढले. त्यावेळी सुशिला यांनी नवरा मारूती यांना घरातील कामे करू का? तुम्हाला नाश्ता देऊ इतकेच विचारले याचा राग मारूती यांना आला. संध्याकाळी लावण करून गडी माणसे निघून गेली. मारूती हे दारूच्या गुत्याला भेट देऊन रात्री ८.३०च्या सुमारास घरात आले. त्यावेळी सगळी कामे उरकून सुशिला या घरातील बाहेरच्या रुममध्ये टीव्ही पाहत सोप्यावर बसल्या होत्या. त्या निवांत टीव्ही पाहत बसल्याचा राग मारूती यांना आला. अगोदरच सकाळच्या भांडणाचा राग त्याच्या मनात होता.त्यात बायको निवांत टीव्ही पाहत बसली आहे. तिला आपले काहीच सोयर सुतक नाही, आपण दिवसभर शेतात राबायचे ही इथे फतकल मारून टीव्ही पाहत बसली आहे याचा राग त्यांना आला. तिला काहीच कळू न देता त्यांनी घरातील कोयता घेतला आणि तिच्या मानेवर सपासप वार केले. त्यासरशी तिची मान तुटून बाजुला फरशीवर पडली. घरातील सोप्यावर आणि फरशीवर रक्ताचे डाग पडले. तिच्या एका हातात तसाच टीव्हीचा रिमोट होता. गळयातील मंगळसुत्र तसेच तुटून बाजुलाच पडले होते. त्याने तिला ओरडण्याची साधी संधी ही दिली नाही. घरात मुलगा सून नसल्याचे बघून त्यांनी तिचे काम तमाम केले. रक्ताने माखलेला कोयता तेथच टाकून दिला. तिचा खून करून घराचा दरवाजा तसाच पुढे सरकवून ते तेथून निघून गेले. रात्री उशिरा पर्यत त्याच्या घरातून टीव्हीचा आवाज येत होता. रात्री ९.३०च्या दरम्यान कोणत्या तरी कामाच्या निमित्याने मारूती याचा भाऊ चन्नाप्पा बेळाज हा मारूती याच्या घरात गेला असता त्याला घराचा दरवाजा नुसताच पुढे केलेला दिसला. तो दरवाजा उघडून आत गेला असता त्याला छातीत धडकी बसवणारे दृश्य दिसले. वहिनी सुशिला हिची मान तुटून बाजुला पडली होती तर टीव्ही तसाच चालू होता. घरातील सोप्यावर आणि फरशीवर रक्ताचे डाग पडलेले दिसल्यावर ते ओरडतच बाहेर आले. त्यासरशी बाजुलाच असणारी भाऊ बंदातील लोक ही धावत आले. त्याने कसे बसे धीर धरून लोकांना सांगितले. लोकांनी ही घटनास्थळी जावून पाहिले. धडकी भरवणारे दृश्न बघून अनेकांची बोबडीच वळाली होती. चन्नाप्पा याने या घटनेची माहिती मारूती याचा मुलगा बसवराज याला फोनवरून दिली. तो ही तासाभरात हिटणी येथे आला. तो पर्यत भाऊबंदातील लोक आणि खणदाळ येथील लोक ही घटनास्थळी जमले. कुणी तरी या घटनेची माहिती गडहिंग्लज पोलीसाना दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस ही तातडीने खणदाळ हिटणी येथील बेळाज याच्या शेतातील घटनास्थळी आले. रात्री उशिरा पर्यत पोलीसांनी या घटनेची माहिती घेऊन पंचनामा केला. घटनास्थळावरील दृश्य बघून पोलीस ही हादरले होते.पोलीस या घटनेची माहिती घेत असताना मृतदेह शवविच्छेदनासाठी गडहिंग्लज येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. घटना स्थळावरू संशयीत आरोपी मयत सुशिला हिचा पती मारूती बेळाज हे पळून गेले होते. या घटनेची माहिती पोलिसांनी मयत सुशिला हिचा मुलगा बसवराज बेळाज याच्याकडून घेऊन त्याच्याकडून रितसर फिर्याद ही घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादी नुसार पोलिसांनी पळून गेलेल्या मारूती बेळाज याचेवर खूनाचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध घेण्यास सुरूवात केली. दुसऱ्या दिवशी शवविच्छेदनानंतर मयत सुशिला हिचा मृतदेह मुलगा बसवराज बेळाज यांच्या ताब्यात पोलीसांनी दिला. त्यांनतर अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना पळून गेलेल्या मारूती बेळाज याला पकडण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषनच्या पोलीसांना यश आले. त्यांनी त्याला गडहिंग्लज पोलिसाच्या ताब्यात दिल्यावर गडहिंग्लज पोलीसांच्या समोर त्याने आपला गुन्हा कबुल केला. त्याने आपला गुन्हा कबुल केला तरी त्याने कोणत्या कारणातून बायकोचा इतक्या निर्दयीपणाने खून केला याचे स्पष्ट कारण त्याने पोलीसांना सांगितले नाही. परंतु पोलीसांच्या प्राथमिक तपासात त्याचे त्याच्या बायकोबरोबर कधीच पटत नव्हते. तसेच तो संशयीवृतीचा असल्याने तो बायकोबरोबर या वयात ही संशय घेऊन भांडण काढून तिला मारहाण करीत असल्याचे पुढे आले. तसेच घटनेच्या दिवशी सकाळी शेतात ऊसाची लावण सुरू असताना बायकोने वेळेत नाश्ता दिला नसल्याने त्याला तिला राग आला होता. या कारणातून त्याने रात्री टीव्ही पाहत बसलेल्या बायकोच्या मानेवर कोयत्याने वार करून तिचा खून केल्याचे त्याने सांगितले. या घटनेची फिर्याद त्याचा मुलगा बसवराज बेळाज याने दिली असल्याने त्याच्या फिर्यदीनुसार सुशिला मारूती बेळाज (वय ५१) हिच्या खून प्रकरणी मारूती शिवाप्पा बेळाज (वय ५९) याच्या विरोधात गडहिंग्लज पोलीस स्टेशनमध्ये भा.दं.वी.कलम ३०२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीसांनी त्याला गडहिंग्लज येथील कोर्टात उभे केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला कोयता जप्त केला. या घटनेचा तपास पोलीस उपाधिक्षक रामदास इंगवले, पोलीस निरीक्षक गजानन सरगर याच्या मार्गदर्शनाखाली दीपाली जोजांळ आणि त्याच्या सहकाऱ्यांनी केला. उतार वयात लेकी सुना आल्या तरी काही जणांत संशयी वृत्ती असल्याने अशा प्रकारच्या खूनाच्या घटना घडतात हेच या घटनेवरून दिसून येते.

## क्रिकेटच्या वादातून राडा ...

चौक या ठिकाणी पूर्ववैमनस्यातून दोन गटात तुफान हाणामारी झाली. यात एका गटाने केलेल्या चाकू हल्ल्यामध्ये एकाचा दुर्दैवी मृत्यू झाला असून सहाजण जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, क्रिकेट खेळण्याच्या वादातून नोव्हेंबरमध्ये दोन गटात हाणामारी होऊन गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर त्याचा राग मनात ठेवून एका गटाने धारदार शस्त्राने केलेल्या हल्ल्यात सातजण जखमी झाले असून त्यापैकी एकाचा रुग्णालयात उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे. यामुळे संपूर्ण भिवंडी पूर्व येथील शांतीनगर परिसरात तणाव निर्माण झाला असून घटनास्थळी सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन सांगळे,शांतीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनायक गायकवाड दाखल झाले असून परिसरात मोठा पोलिस फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. या हल्ल्यात जुबेर शोएब शेख (वय ४६), इस्तियाक शोएब शेख (वय ३२), अबू हमजा शेख, आसिफ वहाब शेख (वय ३६), साजिद वहाब शेख (वय ३३), शेहबाज सोहेल शेख (वय ३४), नोयेब सोहेल शेख हे गंभीर जखमी झाले असून यापैकी जुबेर शोएब शेख यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे, अशी माहिती शांतीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी दिली आहे

## दोन मुलांच्या बापाच्या प्रेमात...

त्या त्यावेळी ती प्रकाशला भेटत होती. ते दोघे ही विवाहित असले तरी त्या दोघांचे ते विवाहबाहय संबंध बहरत होते. तो तिला पाहिजे ते सुख देऊ लागल्यावर रूपालीला आपला नवरा नकोसा वाटू लागला. ती आपल्या नवऱ्याबरोबर कोणत्या ना कोणत्या कारणातून भांडण करून आपल्या माहेरी राहू लागली. नवरा बायकोचे पटेना म्हणून नातेवाईक मध्यस्थांनी मध्यस्थी ही करून पाहिली परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही.तिने नवऱ्या विरोधात कोर्टात केस दाखल करून त्याच्या पासून घटस्फोट घेतला. आपली दोन्ही मुले तिने नवऱ्याकडेच सोडली. आता तिला मोकळे रान झाले. ती प्रकाश हदीमणी बरोबर बिनधास्त फिरू लागली. त्याच्याबरोबर उघडपणे संबंध ठेवू लागली. आता त्या दोघांच्या संबंधाची उघडपणे गावात चर्चा होत होती. प्रकाशला तिने आपले सर्वस्व बहाल केले होते. त्याच्यासाठी तिने आपला संसार मोडून नवऱ्याला मुलांना सोडले होते.आता तिला भिती होती की, प्रकाश आपल्याला सोडून जाईल. या कारणातून तिने प्रकाशला गळ घालून त्याला ही त्याच्या बायको मुलापासून वेगळे केले. प्रकाश आणि ती दोघे ही काम मिळेल तेथे जावून राहु लागले. प्रकाशने तिला ठेवूनच घेतले होते. आता त्याच्या मनात ही पूर्वी सारखे तिच्यावर प्रेम राहिले नव्हते. त्याने तिचा पुरेपुर उपभोग घेतला असल्याने तिच्यापासून त्याचे मन भरले होते. त्यामुळे तो तिच्यापासून लांब राहण्याचा प्रयत्न करीत होता आपल्या बायको मुलांना भेटत होता. त्याचे सोबत राहण्याचा प्रयत्न करीत होता. ही गोष्ट रूपालीला पटत नव्हती. त्याने आपल्यासोबत राहवे म्हणून ती त्याचेमागे लकडा लावीत होती. एकंदरीत दोघांचा ही संसार टागंणीला लागलेला होता. ती मात्र त्याला सोडायला तयार नव्हती. ती त्याची बायको नव्हती परंतु नवऱ्यासारखा ती त्याच्यावर हक्क सांगत होती. कामाच्या शोधात ते दोघे ही कधी हे गाव तर कधी दुसरे गाव असे भटकत फिरत होते. वयाची ३०शी ओलांडलेली रूपाली ही अजूनही भरगच्च जवानीत होती. तिला प्रकाशच त्या कामासाठी पाहिजे होता. त्यामुळे ती त्याला सोडायला तयार नव्हती. आता ती त्याच्या मागे तु तुझ्या बायको पोरांना सोड आणि माझ्याशी लग्न कर, आपण दोघे ही संसार करूया असे म्हरून मागे लागली होती. परंतु प्रकाशला हे मान्य नव्हते. ती बाई आपल्या नवऱ्याला मुलांना सोडते. ती उदया आपल्याला ही सोडेल असे त्याला वाटत होते. ते दोघे एकत्र राहत असताना ती त्याच्यामागे सारखे कटकट लावीत होती. यातूनच तो दारूच्या व्यसनाच्या आहरी गेला. रोज दारू पिऊन घरी येवू लागला. काही तरी कारण काढून रूपालीला मारहाण करू लागला. यामागे त्याचा हेतू एवढाच होता की तिने आपला नाद सोडावा. परंतु होत होत, उलटेच रूपालीचा अगोदरचा संसार मोडला असल्याने ती प्रकाशचा संसार मोडायला निघाली होती.तो मात्र तिच्यापासून लांब राहण्याचा प्रयत्न करीत होता. पण ती त्याला तसे करू देत नव्हती. गेल्या तीन वर्षापासून ते दोघे एकत्र राहत होते. कुठे ही राहयला गेले की दोघे नवरा बायको असल्याचे सांगत होते. दोघे ही सकाळी कामावर गेले की रात्री उशिराच घराकडे परतत होते. तरी ही रात्रीच्या वेळी त्या दोघात नेहमी भांडण तंटा होत होता. दारूच्या नशेत तो रूपालीला अर्वाच्च भाषेत शिव्या देत मारहाण ही करायचा. परंतु तिला तो पाहिजे असल्याने ती त्याचे सगळे सहन करायची. भांडणात ती त्याला म्हणायची, मी तुझी रखेल म्हणून राहयला तयार आहे परंतु तु दारू सोड नीट कामधंदा कर.तुला कामधंदा जमत नसेल तर माझ्या जीवावर बसून खा.परंतु त्याचे तिच्यापासून मन भरल्याने आणि त्याला बायको मुलांची ओढ लागल्याने ती सांगेल तसे वागायला करायला तो तयार नव्हता. हल्लीच ते दोघे कामधंद्याचा शोधात हातकणलंगले इचलकरंजी परिसरात आले. हातकणंगले जवळील लत्मी इंडस्ट्रीतील एका कारखान्यात त्याला व दुसऱ्या एका कारखान्यात तिला काम मिळाले. कामाच्या ठिकाणी लवकर जाता येता यावे म्हणून त्या दोघांनी हातकणंगले येथे भाडयाने खोली करून राहयचे ठरविले. हातकणंगले लक्ष्मी इंडस्ट्री रोडला लागून आण्णा भाऊ साठे समाज मंदिरासमोर राजदीप खोत याची एक खोली त्यांनी भाडयाने केली. त्या भाडयाच्या खोलीत ते दोघे ही शुक्रवार दि.२२ मार्च रोजी राहयला आले. त्या दोघांनी राजदीप खोत यांना आपण दोघे हिगंणगावचे असून नवरा बायको असल्याचे सांगितले. तसेच लक्ष्मी इंडस्ट्रीत कामाला जाता येता यावे म्हणून जवळ खोली करून राहता यावे म्हणून भाडयाने खोली पाहिजे असल्याचे सांगितले. त्या दोघांना कुणी ही पाहिले तरी ते दोघे नवरा बायको असल्यासारखेच वाटत होते. म्हणून खोत यांनी ही त्याची जास्त काही विचारपूस न करता त्यांना एक खोली भाडयाने दिली. भाडयाने खोली केल्यानंतर त्या दोन दिवसात ते दोघे कामाला ही गेले नाहीत. दोघांनी ही मनसोक्त मजा मारली. मन भरल्यानंतर मात्र प्रकाश याने रंग दाखवायला परत एकदा सुरूवात केली. त्याने कारण नसताना ही रूपाली बरोबर भांडण काढले. दोन दिवस फुल्ल दारू पिऊन तिच्यासोबत मजा मारून तो तिला सोडून देण्याची तंबी देवू लागला. या कारणातून रूपाली ही त्याच्यावर चिडलेली होती. सोमवार दि.२४ मार्च रोजी प्रकाश हा फुल्ल दारू पिऊनच होता. दिवसभर रूपालीला अर्वाच्च भाषेत शिव्या देऊन तु तुझ्या नवऱ्याची मुलांची झाली नाहीस माझी काय होणार म्हणून भांडण काढले. रात्रीच्या वेळी ही झोपताना त्याने तिचे मन दुखावले होते. दोघे ही न जेवताच झोपी गेले होते. परंतु दारूच्या नशेत असणाऱ्या प्रकाशच्या मनात वेगळेच होते. कसे ही करून त्याला तिच्यापासून सुटका करून घ्यायची होती. सरळ पणाने ती त्याच्यापासून लांब जाणार नाही हे त्याला ही माहित होते. गाढ झोपत असलेल्या रुपालीच्या शेजारीच तो झोपला होता. त्याला मात्र झोप लागलेली नव्हती काही ही करून ही ब्याद कायमची त्याला संपवायची होती. म्हणून त्याने मागचा पुढचा विचार न करता घरात पडलेली लांब दोरी घेतली. पहाट व्हयला सुरूवात झाली होती. बाहेर अजून कडूस अंधार होता. त्याने एकदा खोलीचा दरवाजा उघडून बाहेरचा अंदाज घेतला परत दरवाजा लावून घेतला. रूपालीच्या जवळ जावून त्याने तिच्या गळ्याभोवती दोरीचा फास घातला. त्याने तिला जराही हालचाल करण्याची संधी दिली नाही. ती गाढ झोपेत असताना त्याने तिचा दोरीने गळा जोरात आवळून धरला. आपल्या गळ्याभोवती फास आवळला जातोय हे बघून ती जागी झाली. परंतु त्याने आपल्या दोन्ही हातांची ताकद इतकी जोरात लावली की, क्षणार्धात त्याने तिचे काम तमाम केले. तिचा श्वासो श्वास थांबल्यावर त्याने तिचा गळा सोडला. आपल्या हातून तिचा खून झाला आहे हे त्याने ओळखले. रात्रीच्या अंधारात त्याने खोलीला बाहेरून कडी लावून तो पळून गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी १०.०० वाजत आले तरी रूपाली बाहेर दिसत नाही उलट तिच्या खोलीला बाहेरून कडी लावल्याचे दिसत असल्याने शेजारच्यांना शंका आली, कारण आदल्या रात्री नवरा बायकोची भांडण झाल्याचे त्यांना माहित होते. दुपारपर्यंत काहीच हालचाल जाणवली नसल्याने शेजारीच राहणाऱ्या नागेश दुंडाप्पा काळे यांना शंका आली. त्यांनी कडी काढून दरवाजा उघडून आत जावून पाहिले तर पंलगावर रूपाली ही मृत्तावस्थेत दिसली. तिच्या गळ्या भोवती दोरीचा फास होता. तिला पालथ्या अवस्थेत झोपवण्यात आले होते.त्याने ही घटना घरमालक राजदीप खोत यांना सांगितली. त्यानंतर ही घटना हातकणंगले पोलीसांना कळविण्यात आली. या घटनेची माहिती मिळताच हातकणंगले पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. या घटनेची माहिती त्यांनी शेजाऱ्याकडून घेतली असता राजदीप खोत याच्या मालकीच्या खोलीत रूपाली आणि प्रकाश हे दोघे राहयला आल्याचे समजले. त्या दोघांचे ही विवाहबाहय संबंध असल्याची माहिती पोलीसांना मिळाल्यावर रूपालीचा गळा आवळून खून तिचा प्रियकर प्रकाश हदीमणी यानेच केला असावा अशी शंका पोलीसांनी व्यक्त केली. घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनसाठी हातकणंगले ग्रमीण रुग्णालयात पाठवून देण्यात आला. या घटनेची माहिती मयत रूपालीच्या नातेवाईकांना देण्यात आली. या घटनेनंतर प्रकाश हदीमणी हा पळून गेला असल्याने पोलीस त्याचा शोध घेत होते. या घटनेचा तपास हातकणंगले पोलीसाबरोबरच एलसीबीचे पोलीस ही करीत होते. एलसीबीच्या एका पथकाला प्रकाश हदीमणी हा हातकणंगले आळते रस्त्यावरील आळते गावातील हायवे वरील रेणुका मंदिराच्या परिसरात प्रकाश हदीमणी हा एलसीबीच्या एका पथकाला मिळून आला. त्याला हातकणंगले पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले. त्यावेळी ही दारूच्या नशेत होता.त्याची दारूची नशा उतरल्यानंतर पोलीसांनी त्याला बोलते केले असता त्याने आपल्या गुन्हयाची कबुली देऊन तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यानंतर नागेश काळे याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी रूपाली दादासो गावडे (वय ३०) हिचा गळा आवळून खून केल्या प्रकरणी तिचा प्रियकर प्रकाश शेखर हदीमणी (वय ३३) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला पोलीसांनी हातकणंगले येथील कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली दोरी जप्त केली. या घटनेचा पुढील तपास पो.निरी.अशोक सायकर याच्या मार्गदर्शनाखाली पो.हेड.कॉ.महादेव खेडकर हे करीत आहेत. विवाहबाहय संबंधात विवाहित महिला ही वाहवत गेली की ती कोणत्या ही थराला जाते. इथेच तिची खरी तर फसगत होत असते. परंतु तिला फक्त तोच पाहिजे असल्याने आपल्या संसाराची राख रांगोळी करून घेते हेच या घटनेवरून दिसून येते.

## मनपा अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतला रोग निदान शिबीराचा लाभ

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर शहर महानगरपालिका, लातूर अंतर्गत कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी दि.५ एप्रिल २०२४ वार शुक्रवार रोजी सर्व रोग निदान शिबीर आयोजन करण्यात आले होते. या शिबीरामध्ये एकुण ३०५ अधिकारी व कर्मचारी यांना विशेष तज्ञामार्फत सेवा देण्यात आली. मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या संकल्पनेतून तसेच उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे, उपायुक्त शुभम क्यातमवार, मुख्य लेखा अधिकारी रावसाहेब कोलगणे यांच्या सुचनेनूसार सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सर्व रोग निदान शिबीर राबवण्यात आले. सदरच्या शिबीरामध्ये आरोग्य तपासणी सोबत कर्मचाऱ्यांचे आयुष्मान कार्ड नोंदणी करण्यात आली. तसेच २० अधिकारी व कर्मचारी यांनी रक्तदान देखील केले. शिबीर यशस्वी होण्यासाठी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती, शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ.रामेश्वर कलवले, शहर लेखा व्यवस्थापक शिवकुमार तेली, तसेच डॉ. रमेश बगडे, डॉ.रोंगे, डॉ.बनसोडे, डॉ.स्वामी, डॉ.प्रेरणा जाधव, डॉ.श्रीकांत फड, डॉ.सुब्बाराव, डॉ. नितीन बर्डे, डॉ.निलेश कंदे, डॉ.अतिया सय्यद, पार्श्वनाथ पाटील, आतिश सुळ, मंगेश शिरसाठ, बब्रुवान गुंजोटे, सुरेंद्र कांबळे आदींनी परिश्रम घेतले.

08 TO 14 APRIL 2024 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 4/6/2024 8:06 PM Page 1



# भिवंडी लोकसभा काँग्रेसच्या पारंपरिक मतदारांच्या हक्काची -दयानंद चोरघे




**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी लोकसभा मतदारसंघात प्रत्येक वेळी भिवंडी पूर्व व पश्चिम विधानसभा मतदारसंघातून काँग्रेस पक्षाला हजारो मतांचे मताधिक्य मिळत आले असल्याने पारंपारिक काँग्रेस मतदारांच्या भिवंडी लोकसभा मतदार संघावर इतर पक्षांनी केलेला दावा चुकीचा असल्याची प्रतिक्रिया काँग्रेस ठाणे जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांनी व्यक्त केली आहे. भिवंडी लोकसभा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला दिली जात असल्याच्या बातम्या नंतर नुकताच भिवंडी शहर काँग्रेस कार्यालयात काँग्रेस पदाधिकारी यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दयानंद चोरघे यांनी ही भूमिका मांडली आहे. याप्रसंगी प्रदेश सचिव मनीष गणोरे, भिवंडी शहर जिल्हाध्यक्ष रशीद ताहीर मोमीन, माजी खासदार सुरेश टावरे, कल्याण जिल्हाध्यक्ष सचिन पोटे, पालघर जिल्हा अध्यक्ष प्रफुल्ल पाटील, यांसह ठाणे जिल्ह्यातील तालुकाध्यक्ष विजय पाटील, चेतनसिंह पवार, जिल्हा सरचिटणीस पंकज गायकवाड, युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस वीरेन चोरघे, प्रदेश सचिव निलेश भोईर उपस्थित होते. काँग्रेसला मानणारा पारंपरिक मतदार असलेला मोठा वर्ग भिवंडी लोकसभा मतदार संघात आहे. काँग्रेस पक्षाचे पंजा हे चिन्ह नागरिकांच्या मनात ठसले असताना इतर पक्षांना हा मतदारसंघ सोडण्यास आमचा विरोध कायम आहे, असे स्पष्ट करीत काँग्रेस पक्षाच नव्हे तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सुध्दा कल्याण व ठाणे येथे दोन वेळा हरले आहेत मग तेथे सुध्दा हाच न्याय लावणार का असा सवाल दयानंद चोरघे यांनी पत्रकार परिषदेत उपस्थित केला. भिवंडी लोकसभा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षास सोडल्यास काँग्रेस कायमची जागा गमवून बसू शकते त्यासाठी काँग्रेस पक्षानेच ही जागा लढवावी हा आमचा आग्रह आहे. या ठिकाणी फक्त काँग्रेस पक्षच विजयी होऊ शकतो अशी भूमिका माजी खासदार सुरेश टावरे यांनी व्यक्त केली. खोटी आश्वासन प्रलोभने दाखवून सत्तेवर आलेल्या भाजपाने २०१४ व २०१९ मध्ये केलेल्या पराभवाचा बदला काँग्रेस पक्षाला घ्यायचा आहे. कोकणातून काँग्रेस हद्दपार करण्याचा घाट काहींनी घातला आहे. त्यामुळे काँग्रेस जिवंत ठेवण्यासाठी भिवंडी लोकसभा काँग्रेस पक्षाच्या चिन्हा वर लढवली गेली पाहिजे असा ठराव सर्वसंमतीने घेण्यात आला असल्याची माहिती प्रदेश सचिव मनीष गणोरे यांनी व्यक्त केली आहे.

# देवणी येथे महाविकास आघाडीची सुसंवाद बैठक संपन्न

**देवणी/शकील मनियार**



लातूर लोकसभा मतदारसंघ निवडणुकीतील महाविकास आघाडी पुरस्कृत काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ.शिवाजीराव काळगे यांच्या प्रचारार्थ बोरोळ पंचायत समिती विभागाची सुसंवाद बैठक कै.रसिका महाविद्यालय, देवणी येथे संपन्न झाली. आ.अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या या बैठकीसाठी लोकसभा निवडणुकीचे उमेदवार डॉ शिवाजीराव काळगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या बैठकीचे प्रास्ताविक महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव गजानन भोपणीकर यांनी केले. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सचिव अभय साळुंखे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटी सरचिटणीस गोविंदराव भोपणीकर, मल्लिकार्जुन मानकरी, दिलीप पाटील नागराळकर, भगवानराव पाटील विजयनगरकर, काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष अजित बेळकोणे, लातूरचे माजी महापौर दिपक सूळ, लातूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष किरण जाधव, इम्रान पठाण, सोनू डगवाले, वैजनाथ लुल्ले, मुकेश सुडे आदी मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती. यावेळी लोकसभा निवडणुकीचे उमेदवार डॉ. शिवाजीराव काळगे यांनी मा. राहुलजी गांधी, मल्लिकार्जुन खरगे, दिलीपराव देशमुख, आ. अमित देशमुख यांच्या पाठीशी जनतेने भक्कम उभे राहून हात बळकट करण्यासाठी येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत मला भरघोस मतांनी विजयी करून सर्वसामान्य जनतेची सेवा करण्याची संधी आपण द्यावी. तसेच सर्वसामान्यांचा प्रतिनिधी म्हणून मला संसदेमध्ये कार्य करण्याची आपण संधी द्यावी असे आवाहन केले. या बैठकीस देवणी व बोरोळ परिसरातील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), शिवसेना (उबाठा गट) पक्षातील कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात रामभाऊ भोपणीकर, अंकुश माने, राहुल बालूरे, कृष्णा पाटील, प्रताप कोयले, पांडुरंग बिरादार, सुरेश चिंचोळे, औदुंबर पांचाळ, सोमनाथ बिरादार, अनिल पाटील, ताहेर पटेल, जनार्धन बिरादार, देविदास पतंगे, अमोल हसणाबादे, जनर्धन बिरादार, गोविंदराव बिरादार, संताजी पाटील, अविनाश दोडके, अनिल कुसनूरे, अंकुश बागवाले, रितेश सूर्यवंशी यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# गोल्डन व्हॅली पब्लिक स्कूल देवणी आणि समर्थ फाउंडेशन संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर संपन्न




**देवणी/प्रतिनिधी**

स्व.लक्ष्मीबाई चैरिटेबल अँड एज्युकेशनल ट्रस्ट संचलित गोल्डन व्हॅली पब्लिक स्कूल देवणी व समर्थ फाउंडेशन संयुक्त विद्यमाने भव्य रांगोळी स्पर्धा व रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. बुधवारी दिनांक ३ एप्रिल रोजी रांगोळी स्पर्धा १५ वर्षा पुढील सर्व युवक युवती साठी विनामूल्य होती सदर स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय, येणाऱ्यास पारितोषक ठेवण्यात आले आहे. रक्तदान व रांगोळी स्पर्धेचे ठिकाण गोल्डन व्हॅली पब्लिक स्कूल मिनी मार्केट येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी समर्थ फाउंडेशन संचालक तथा संस्थापक अध्यक्ष राजेंद्र संगेकर, संस्थेचे सचिव श्रीमती शिल्पा संगेकर, अंबरखाने ब्लड बँक उदगीरचे रक्त संकलन अधिकारी डॉ.बी.एम. शेटकार, रक्तदान शिबिराचे उद्घाटक व्यापारी संघटनेचे अध्यक्ष सोमनाथ लुल्ले यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी तुकाराम पाटील, शाळेचे मुख्याध्यापक सोनाली कापडे, उपसरपंच गजानन गायकवाड अजनीकर, भैय्यासाहेब देवणीकर, घंटे डी के, रमेश गायकवाड, पत्रकार लक्ष्मण रणदिवे, जयेश ढगे, धनराज तळणीकर, कल्पना देवणीकर, नेहा पोतदार, पूजा परीट, जामगे जयश्री, पतंगे बिड्डू, दीक्षा शृंगारे, रामेश्वर कापडे, भागवत नेळगे, गोल्डन व्हॅली पब्लिक स्कूलचे सर्व स्टाफ यावेळी उपस्थित होते.

# तलासरी तालुक्यातील वरवाडा आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकावर गैरवर्तन केल्याचा आरोप

**पालघर/प्रतिनिधी**

तलासरी तालुक्यातील वरवाडा आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकाने गैरवर्तन केल्याची तक्रार येथील विद्यार्थिनी आणि पालकांनी केली आहे. संबंधित मुख्याध्यापकाला डहाणू प्रकल्प अधिकाऱ्याने कारणे दाखवा नोटीस बजावली असून खुलासा मागवला आहे. सत्यता पडताळून कार्यवाही करण्यात येईल, असे आदिवासी प्रकल्प कार्यालयाकडून सांगण्यात आले. तलासरी तालुक्यातील वरवाडा आश्रमशाळेतील मुख्याध्यापकाने विद्यार्थिनींसोबत गैरवर्तन केल्याची तक्रार पालक आणि विद्यार्थिनींनी केली आहे.

डहाणू आदिवासी विभागाचे प्रकल्प अधिकारी यांनी मुख्याध्यापकाला कारणे दाखवा नोटीस बजावली असून खुलासा देण्यास सांगितले आहे. या घटनेची सखोल चौकशी करून कार्यवाही करण्यात येईल, असे प्रकल्प कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान आश्रमशाळेतील १९ विद्यार्थिनींनी मुख्याध्यापकाविरोधात तक्रार केली असून यामुळे विद्यार्थिनींच्या सुरक्षेबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. यासंदर्भात संबंधित मुख्याध्यापकाशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. दरम्यान या प्रकरणात संबंधित घटनेची चौकशी करण्यासाठी समिती गठित करण्यात आली आहे. त्याचा अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल, असे डहाणू आदिवासी प्रकल्प प्रकल्पाधिकारी सत्यम गांधी यांनी सांगितले.

# पाणीटंचाई विरोधात भिवंडी महापालिका मुख्यालयासमोर नागरिकांचे धरणे आंदोलन



**भिवंडी/प्रतिनिधी**

मार्च महिन्याच्या अखेरीस सर्वत्र पाणीटंचाईचे चटके लागण्यास सुरुवात झाली आहे. भिवंडी शहरातील काही विभागांमध्ये नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. पालिका मुख्यालयापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या निजामपूरा कसाई वाडा या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पाणी टंचाई होत असल्याने तेथील स्थानिकांनी लालबावटा असंघटित कामगार संघटनेचे नेते कॉम्रेड विजय कांबळे यांच्या नेतृत्वाखाली पालिका मुख्यालयासमोर रिकामे हांडे बादल्या घेऊन धरणे आंदोलन करण्यात आले आहे. सध्या रमजान महिना सुरू असून मुस्लिम समाजाला पाण्याची नितांत गरज असताना या परिसरात पाणी पुरवठा करण्यासाठी पालिका प्रशासन असमर्थ ठरले असल्याने नागरिकांना हे पाऊल उचलावे लागले असून पालिका पाणी पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांचा नाकर्तेपणा जबाबदार असून यावर तातडीने उपाययोजना न केल्यास आचारसंहितेची तमा न बाळगता अधिक उग्र आंदोलन केले जाईल असा इशारा कोम्रेड विजय कांबळे यांनी दिला आहे.

# मिरारोडमध्ये स्कायवॉकचा पत्रा डोक्यावर पडून तरुणी जखमी!



**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

स्काय वॉकला लावण्यात आलेला पत्रा कोसळून खालून जाणारी एक तरुणी गंभीर जखमी झाली आहे. गुरूवारी संध्याकाळी मिरा रोड येथे ही दुर्घटना घडली. याप्रकरणी पत्रा लावणारे आणि त्याची डागडुजी करणार्यांविरोधात नया नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नियती चौबड (१९) ही तरुणी मिरा रोड पूर्वेच्या कनकिया परिसरात राहते. ती मिरा रोड येथील गुरूकुल स्पोर्टस ॲण्ड करियर अकादमीमध्ये पोलीस भरतीच्या सरावासाठी जात असते. गुरूवारी संध्याकाखील साडेचारच्या सुमारास मिरा रोड येथील स्कायवॉकच्या खालून ती नेहमीप्रमाणे अकादमीत जात असताना पोस्ट ऑफिससमोर असलेल्या स्कायव वॉकला लावलेला पत्रा तिच्या डोक्यावर आदळला. या दुर्घटनेत ती गंभीर जखमी झाली. तिच्या डोक्याला सहा टाके पडले आहेत. स्कायवॉकला लावण्यात आलेले पत्रे योग्य पद्धतीने लावण्यात आले नव्हते. या कामात निष्काळजीपणा करण्यात आला होता. त्यामुळे नया नगर पोलिसांनी पत्रा लावणारे आणि त्याची डागडुजी करणाऱ्यांविरोधात कलम ३३७, ३३८ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# कल्याण रेल्वे स्थानकातील स्कायवॉकवर मजुरावर चाकू हल्ला करून मजुरीचे दोन हजार रूपये लुटले!

**कल्याण/प्रतिनिधी**



कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक परिसरातील गुन्हेगारी दिवसेंदिवस वाढत आहे. सामान्य पादचारी, प्रवाशांना या गुन्हेगारीचे सर्वाधिक चटके बसत आहेत. मागील सहा महिन्यांत अनेक लुटमारीच्या घटना कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक परिसरात घडल्या आहेत. अशा परिस्थितीत गुरुवारी रात्री बारा वाजता एक कष्टकरी मजुराला तीन चोरट्यांनी कल्याण रेल्वे स्थानकातील स्कायवॉकवर अडविले. त्याच्यावर चाकू हल्ला करून त्याच्या जवळील दोन हजार रुपये लुटले आहेत. खुशीराम मिना (२२) असे कष्टकरी मजुराचे नाव आहे. तो मुळचा राजस्थानमधील रहिवासी आहे. तो सध्या भिवंडी जवळील पडघा ढोलेगाव येथे राहतो. कल्याण, भिवंडी परिसरात मजुरीची कामे करून तो कुटुंबियांची उपजिविका करतो. कल्याणमध्ये दिवसभर मजुरीचे काम केल्यानंतर तक्रारदार खुशीराम मीना गुरुवारी रात्री कल्याण पश्चिमेतील दरबार हॉटेल समोरील स्कॉयवॉकवरून भिवंडीला जाणारी रिक्षा किंवा इतर वाहन पकडण्यासाठी जात होता. त्यावेळी स्कायवॉकवर १६ ते १८ वयोगटातील तीन तरूणांनी त्याला अडविले. त्याच्यावर अचानक धारदार चाकुने हल्ला करून त्याला दुखापत केली. अचानक घडलेल्या या प्रकाराने खुशीराम घाबरला. त्याने या दोन तरूणांच्या तावडीतून पळण्याचा प्रयत्न केला, पण त्याला दोन्ही आरोपींनी पकडून ठेवले. त्याला बेदम मारहाण केली. त्यांला चाकुने गंभीर दुखापत करून खुशीरामने दिवसभर मजुरी करून मिळविलेले दोन हजार रूपये तिन्ही भामट्यांनी खुशीरामच्या खिशातून जबरदस्तीने काढून घेतले. तक्रारदाराने त्यास प्रतिकार केला पण त्याचा उपयोग झाला नाही. कोणीही प्रवासी तक्रारदाराच्या मदतीला धावले नाही. खुशीरामने रात्रीच महात्मा फुले पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार केली. पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत. रात्री अकरा वाजल्यानंतर कल्याण रेल्वे स्थानकाच्या बाहेर अनेक भुरटे चोर पादचाऱ्यांना लुटण्यासाठी फिरत असतात. यामध्ये काही भुरट्या महिलांचा समावेश आहे. एक टोळीच प्रवाशांना लुटण्याचे हे काम करते. कल्याण रेल्वे स्थानक हा वर्दळीचा भाग असुनही रात्रीच्या वेळेत या भागात प्रवाशांना लुटण्याचे प्रकार घडत आहेत. हे माहिती असुनही स्थानिक पोलीस या भागात रात्रीची गस्त वाढवित नसल्याने, याठिकाणी कायमस्वरुपी पोलीस तैनात करत नसल्याने नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत.

# वसई तालुका वकील संघटनेच्या उपाध्यक्षा ॲड. साधना धुरी यांना मातृशोक!

**वसई/प्रतिनिधी**



पहिले वसई तालुका शिवसेनाप्रमुख स्व. मधुकर धुरी यांच्या पत्नी, तथा वसई तालुका वकील संघटनेच्या उपाध्यक्षा ॲड. साधना धुरी यांच्या मातोश्री श्रीमती वृंदा मधुकर धुरी यांचे गुरुवारी सायंकाळी वयाच्या ८३व्या वर्षी अल्पशा आजाराने त्यांच्या राहत्या घरी दुखद निधन झाले. मुंबई महापालिका शाळेतून विदयार्थीप्रिय शिक्षिका म्हणून त्या निवृत्त झाल्या होत्या. त्यांच्या पश्चात साधना व सीमा या दोन्ही कन्या, पुत्र संजय, जावयी अशोक रणखांब व नातवंडे असा परिवार आहे. आज सकाळी एव्हरशाईनसीटी येथील निवासस्थानी आमदार हितेंद्र ठाकूर यांनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले. त्यानंतर १० वाजता नवघर पूर्व येथील महापालिकेच्या स्मशानभूमीत श्रीमती वृंदा यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी माजी महापौर नारायण मानकर, माजी सभापती संदेश जाधव, माजी नगराध्यक्ष नितीन राऊत व भरत गुप्ता, ज्येष्ठ पत्रकार अनिलराज रोकडे, शिवसेनेचे विनायक निकम व राजाराम बाबर, ज्येष्ठ वकील ॲड. किशोर पाटील, भाजपाचे शेखर धुरी, शिक्षणतज्ञ् अरविंद कारखानीस, ॲड. नयन जैन, ॲड.अशपाक हुसेन, माजी नगरसेवक छोटू आनंद, मुक्त पत्रकार दिलीप डाबरे, उद्योजक दीपक व्होरा, सिराज कमाल आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सर्व उपस्थित्तांतर्फे स्व.श्रीमती वृंदाताई धुरी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# शैक्षणिक संस्थेत घोटाळ्या प्रकरणी राष्ट्रवादी मिरा-भाईंदर जिल्हाध्यक्षांना अटक

**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**



गेल्या सव्वा महिन्यांपासून फरार असणारे मिरा-भाईंदर राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष मोहन पाटील यांना शुक्रवारी मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या आर्थिक गुन्हे शाखेने शुक्रवारी अटक केली आहे. अटकपूर्व जामिन फेटाळल्यानंतर अटक करण्यात आली आहे. मोहन पाटील यांना ८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. भाईंदर पूर्व येथील अभिनव शेतकरी शिक्षण मंडळाच्या कार्याध्यक्षपदी असताना मोहन पाटील यांनी कोट्यावधी रुपयांचे आर्थिक फेरफार केल्याचे त्यावर संस्थेतील सदस्यांनी आरोप केले होते. शाळेतील विद्यार्थांना दिल्या जाणारी खिचडी आणि ओळखपत्र वाटप तसेच संगणक खरेदीती मधील घोटाळ्याचा समावेश आहे. या प्रकरणावरून संस्थेतील दोन गटात न्यायालयीन लढाई देखील सुरु आहे. दरम्यान यातील एका प्रकरणात मोहन पाटील यांच्या विरोधात २०१८ साली नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तो तपास नंतर आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला होता. या प्रकरणात अटकेपासून संरक्षण मिळावे म्हणून पाटील यांनी २४ फेब्रुवारी २०२४ रोजी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र ही मागणी न्यायालने फेटाळल्यानंतर ते फरार झाले होते. अखेर शुक्रवारी पहाटे पाटील यांना पोलिसानी अटक केली आहे. तर हा वाद चर्चेत असतानाच चार महिन्यापूर्वी राष्ट्रवादी (अजित पवार गट) पक्षाने त्यांची जिल्हा अध्यक्षपदी निवड केली होती.

# भिवंडीत नवीन मतदार झालेल्या युवकांना मार्गदर्शन मेळावा संपन्न

**भिवंडी/प्रतिनिधी**



लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वधी साठी निवडणूक आयोगा कडून मोठ्या प्रमाणावर जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. भिवंडी पश्चिम विधानसभा अंतर्गत सार्वत्रिक लोकसभा निवडणूक कार्यक्रमांतर्गत स्विप कक्ष भिवंडी यांच्या मार्फत बी एन एन महाविद्यालय येथे मतदार जनजागृती अंतर्गत माव मतदार झालेल्या युवकांसाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन बुधवारी करण्यात आले होते. या कार्यक्रमात सहाय्यक निवडणूक अधिकारी उदय किसवे तसेच तहसीलदार अभिजीत खोले यांनी मार्गदर्शन केले. सर्व युवक मतदारांना तसेच त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांना मतदान प्रक्रियेमध्ये मतदानाचा हक्क बजावण्यासाठी आवाहन करीत युवकांना आयुष्य घडवताना या विषयावर उदय किसवे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी भिवंडी महानगरपालिका सहाय्यक उपायुक्त सुनील झळके व स्वीप कक्ष समिती सदस्य भामरे, परदेशी, सातपुते, जाधव, पाटील, तुपांगे, मुळे, राठोड यांसह सुमारे ३०० युवक माव मतदार उपस्थित होते. बीएनएन महाविद्यालयाचे उपप्राचार्य निकम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

08 TO 14 APRIL 2024 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 4/6/2024 8:06 PM Page 1



# तिकीट कापलेल्या अतृप्त आत्म्याचे सूडसत्र सुरू

यंदाची लोकसभा निवडणूक ही इतर निवडणुकी पेक्षा निश्चितपणे वेगळी असणार आहे. कारण या निवडणुकीत सत्ताधारी आणि विरोधी आघाडी दोन्ही ठिकाणी जे लोक एकत्र आलेले आहेत त्यांच्यातील पूर्वीची राजकीय दुश्मनी अजून संपलेली नाही. अशा स्थितीत पुन्हा युती किंवा आघाडीच्या माध्यमातून एकत्र आल्यानंतरही त्यांच्यावर अन्याय झाला तर ते गप्प बसणार नाहीत. यावेळी त्यांच्यातील पूर्वीची राजकीय दुश्मनी नव्याने उफाळून येईल आणि मग युती किंवा आघाडीचा धर्म बाजूला ठेऊन ते आपल्या सोबत असलेल्यांना धडा शिकवल्या शिवाय रहाणार नाहीत. सध्या सत्ताधारी महायुतीत असेच सुरू झाले आहेत. भाजपच्या लोकांनी शिवसेना आणि राष्ट्रवादी फोडून महायुतीचे सरकार बनवले. सत्तेचे फायदे घेण्यासाठी हे लोक गेले दीड वर्ष गप्प होते. पण आता लोकसभा निवडणुकीत त्यांनी आपले खरे रूप दाखवायला सुरुवात केली आहे. महायुतीत सामील होताना भाजपाकडून अजित पवार आणि शिंदे गटाला आश्वासन देण्यात आले होते की लोकसभा आणि राज्यसभेच्या निवडणुकीत जे तिन्ही पक्षांचे जे आमदार-खासदार असतील त्यांचे निवडणुकीत तिकीट कापले जाणार नाही. पण आता लोकसभा निवडणुकीत मात्र त्यांच्या तोंडाला पाने पुसण्यात आली आहेत. जागा वाटपात शिंदे गटाच्या पाच खासदारांचे पत्ते कापण्यात आले. त्यामुळे शिंदे गटात भाजपाच्या आणि खास करून फडणवीस यांच्या विरुद्ध खूप संतापाची भावना आहे. अजित पवारांच्यासाठी अत्यंत प्रतिष्ठेची असलेल्या बारामती लोकसभा मतदार संघात महायुतीकडून दादांच्या पत्नी सुनेत्रा पवार उभ्या आहेत, पण सुरुवातीला महायुती मधील शिंदे गटाचे नेते विजय शिवतारे यांनी अजित पवार विरुद्ध दंड थोपटले. पण फडणवीसांनी त्यांना कसेबसे शांत केले, पण शिवतारे वरवर शांत झाले असल्याचे दिसत असले तरी या निवडणुकीत कुठल्या ना कुठल्या मार्गाने अजित पवारांना ते धडा शिकवणार आहेत. शिवतारे शांत झाल्याचे दिसत असले तरी त्यांचे कार्यकर्ते मात्र गप्प बसणार नाहीत. कारण अजित दादा यांच्या सोबत त्यांची जी जुनी दुश्मनी आहे ती या निवडणुकीत ते काढणार शांत बसणार नाहीत. दादाचे दुसरे विरोधक हर्षवर्धन पाटील यांच्यात व दादाच्यात फडणवीसांनी समझोता घडवून आणला, पण माजी मंत्री असलेल्या हर्षवर्धन पाटील यांना अजित दादांनी जो त्रास दिला आहे, त्याचा बदला घेतल्याशिवाय हर्षवर्धन गप्प बसणार नाहीत. शिंदे गटांच्या पाच उमेदवारांचा पत्ता कापण्यात आला आहे. त्यामुळे हे पाचही उमेदवार नाराज आहेत. यामध्ये कृपाल तुमाने यांचा रामटेक मधून पत्ता कापण्यात आला. भावना गवळींचा यवतमाळ वाशिम मधून पत्ता कापण्यात आला. हेमंत गोडसे यांचा नाशिक मधून पत्ता कापण्यात आला. हिंगोलीतून हेमंत पाटलांचा पत्ता कापण्यात आला. तर आता मुख्यमंत्र्यांचे चिरंजीव श्रीकांत शिंदे यांच्या कल्याण-डोंबिवली मतदारसंघावर ही भाजपने धावा केला असून, तिथे भाजपा आणि शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते आमने-सामने आहेत. काही महिन्यांपूर्वी शिंदे गटाच्या महेश पाटलांवर, भाजप आमदार गणपत गायकवाड यांनी पोलीस ठाण्यात घुसून फायरिंग केल्यापासून, शिंदे आणि भाजपातील वाद शिगेला पोचलेला आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत यावेळी श्रीकांत शिंदे यांना कल्याण-डोबवलीतून उभे राहायला द्यायचे नाही. आणि उभे राहिले तरी त्यांना योजनाबद्धरित्या पाडायचे असा कट भाजपातून आखला जात आहे. हे सर्व पाहता या निवडणुकीत सत्ताधारी महायुतीतील अजित दादा, शिंदे आणि भाजपाच्या उमेदवाराला विरोधी पक्षांकडून अजिबात धोका नाही. तर महायुतीत ज्यांच्यावर अन्याय झाला ज्यांचे पत्ते कापण्यात आले. तेच नाराज पुढारी महायुतीतील लोकसभा उमेदवारांना धडा शिकवल्याशिवाय राहणार नाहीत. अशा परिस्थितीत भाजपाचे महाराष्ट्रात ४५ प्लस जागा जिंकण्याचे स्वप्न कदापि पूर्ण होणार नाही. यावेळी महाराष्ट्रात संपूर्ण महायुतीला वीस जागा मिळतानाही मारामारी आहे. त्यामुळे ही निवडणूक म्हणजे सत्ताधारी महायुती आणि विरोधी पक्ष असलेल्या महाविकास आघाडीतील घटक पक्षांमधीलच निवडणूक आहे. महायुतीप्रमाणेच महाविकास आघाडीमध्ये ही प्रचंड बेबनाव आहे. जागा वाटपाचे सूत्र ठरण्यापूर्वीच शिवसेना ठाकरे गट, शरद पवार गट आणि काँग्रेस यांनी आपापले उमेदवार जाहीर करून टाकले. त्यामुळे आता काही महत्त्वाच्या जागांवरून महाविकास आघाडी मधील तीन पक्षांमध्ये संघर्ष सुरू झालाय. खास करून सांगलीच्या जागेवरून संघर्ष तीव्र झालाय. सांगलीमध्ये काँग्रेसला विश्वासात न घेता शिवसेनेने पैलवान चंद्रहार पाटील यांची उमेदवारी जाहीर करून टाकली. तर काँग्रेसने विलास पाटील यांना मैदानात उतरवले. तोच प्रकार भिवंडीत झाला. तिथे शरद पवार गटाने बाळ्या मामा म्हात्रे यांच्यासारख्या नामचीन क्रिमिनलला लोकसभेच्या रिंगणात उतरवले. त्यामुळे काँग्रेस प्रचंड नाराज झाली आहे. आता महाविकास आघाडीचा धर्म न पाळणाऱ्या पक्षांना त्यांचेच मित्रपक्ष धडा शिकवल्याशिवाय राहणार नाहीत. कारण सांगलीमध्ये जर शिवसेनेने चंद्रहार पाटलांची उमेदवारी कायम ठेवली. तर चंद्रहार पाटलांना पाडण्यासाठी काँग्रेसच दोन-चार बंडखोर उभे करील. तोच प्रकार भिवंडीत होईल. महाविकास आघाडीच्या मित्र पक्षांना विश्वासात न घेता बाळ्या मामा सारख्या माणसाला उमेदवारी देणाऱ्या राष्ट्रवादीला धडा शिकवण्यासाठी, काँग्रेस तिथेही बंडखोर उभे करेल आणि बाळ्या मामाला पाडील. अशा तऱ्हेने आता महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात आपसा आपसातच एकमेकांचे उमेदवार पाडण्याची स्पर्धा सुरू होईल आणि त्यात महाराष्ट्राचे मोठे नुकसान होणार आहे. परिणामी महाराष्ट्राला आगामी निवडणुकीत चांगले लोकप्रतिनिधी मिळणार नाहीत आणि सुडाचा हे राजकारण लोकसभा निवडणुकीपासून सुरू होऊन विधानसभा निवडणुकीपर्यंत कायम राहणार आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात शांतता समितीची बैठक उत्साहात





**लातूर/प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महात्मा ज्योतीराव फुले जयंती, श्रीराम नवमी आणि रमजान ईद आदी सण, जयंती उत्सव जिल्ह्यात साजरे होणार आहेत. सर्वधर्मीय बांधवांनी एकमेकांच्या भावनांचा आदर करीत हे जयंती, सण साजरे करावेत. या काळात सामाजिक सलोखा, शांतता कायम राखून लातूर जिल्ह्याची परंपरा जोपासावी, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महात्मा ज्योतीराव फुले जयंती, श्रीराम नवमी आणि रमजान ईदच्या पार्श्र्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित सर्व समाज प्रतिनिधी, जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी यांचा समावेश असलेल्या शांतता समितीच्या बैठकीत श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्यासह भंते भिक्खु पय्यानंद थेरो, विविध समाज बांधव यावेळी उपस्थित होते. लातूर जिल्ह्यात सर्व जाती-धर्मीय बांधव एकत्र येवून सण, उत्सव साजरे करतात, ही आजपर्यंतची परंपरा आहे. त्यामुळे आजपर्यंत जिल्ह्यातील सामाजिक सलोखा आणि शांतता टिकून असून हीच परंपरा कायम राखणे, ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. आगामी काळात साजरे होणारे सण, जयंती उत्सव काळात सर्वांनी नियमांचे पालन करून आणि एकमेकांच्या भावनांचा आदर करून उत्साही वातावरणात साजरे करावेत. यानिमित्ताने आयोजित मिरवणूक, शोभायात्रेत कोणताही अनुचित प्रकार घडू नयेत, याबाबत दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी केले. सण, जयंती उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज आहे. सर्वांनी कायद्याचे आणि आदर्श आचारसंहितेचे पालन करून सण, उत्सव साजरे करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी केले. तसेच जिल्ह्यात शांततामय वातावरणात सण, उत्सव साजरे व्हावेत, यासाठी पोलीस प्रशासनामार्फत उपाययोजना हाती घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. सण, जयंती उत्सव काळातील मिरवणुका, शोभा यात्रा यांना अडथळा होवू नये, यासाठी शहरातील रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येणार आहे. तसेच अडथळा होवू शकणाऱ्या विद्युत वाहिन्या हटविण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली जाईल. मिरवणूक, शोभा यात्रा मार्गावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठीही विविध उपाययोजना करण्यात येणार असल्याचे महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी सांगितले. प्रारंभी जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. बावकर यांनी प्रास्ताविक केले. तसेच पोलीस उपाधीक्षक श्री. फुंदे यांनी आभार मानले. दरम्यान शांतता समितीच्या बैठकीला उपस्थित सर्व समाज बांधवांना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या वतीने मतदार जागृतीची शपथ देण्यात आली. स्वीप कक्षाचे रामेश्र्वर गिल्डा यांनी शपथ वाचन केले. सण, जयंती उत्सव काळात आयोजित विविध उपक्रमांच्या माध्यमातून मतदार जागृती करून जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी यावेळी केले.

# भारत निवडणूक आयोगाच्यानिर्देशांचे पालन करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय पक्ष, उमेदवारांनी पालन करावयाचे नियमांसह इतर आवश्यक बाबींची माहिती देण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली नोंदणीकृत राजकीय पक्ष प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली होती. नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, निवडणूक खर्च नोंदी यासह इतर महत्वाच्या बाबींविषयी यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

अपर जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे आणि संगीता टकले, जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी अप्पासाहेब चाटे, लातूरच्य उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी जिल्हा निवडणूक यंत्रणा सज्ज असून राजकीय पक्ष, उमेदवार यांनीही भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे. नामनिर्देशन पत्रे भरण्यापासून प्रचार विषयक नियम, निवडणूक खर्च सादर करण्याबाबतचे नियम आदी सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. भारत निवडणूक आयोगामार्फत देण्यात आलेल्या निर्देशांचे आणि आदर्श आचारसंहितेचे सर्वांनी पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. कदम यांनी राजकीय पक्षांच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने दिलेले निर्देश, नियमावलीबाबत मार्गदर्शन केले. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी श्री. नेटके यांनी कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पालन करावयाच्या नियमांची माहिती दिली. उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे यांनी नामनिर्देशन पत्रे सादर करताना त्यासोबत द्यावयाची प्रमाणपत्रे, शपथपत्रे यासह इतर अनुषंगिक बाबींविषयी मार्गदर्शन केले. उपजिल्हाधिकारी संगीता टकले यांनी टपाल मतपत्रिकाच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची सविस्तर माहिती दिली. जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा निवडणूक खर्च संनियंत्रण समितीचे नोडल अधिकारी अप्पासाहेब चाटे यांनी उमेदवारांनी निवडणूक खर्चाविषयी ठेवण्याच्या नोंदी आणि त्याबाबतच्या नियमांविषयी माहिती दिली.

# विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेमधील बाधितांना लोकसभा निवडणूकीनंतर भूसंपादनाचा मोबदला मिळणार

**विरार/प्रतिनिधी**

विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेमध्ये पनवेल तालुक्यातील ४४ गावांची जमिनीचे क्षेत्र बाधित होत असून मागील दीड वर्षात भूसंपादनातील दरनिश्चितीची प्रक्रिया रेंगाळल्याने अद्याप भूसंपादनाचा मोबदला मिळू शकलेला नाही. लोकसभेच्या निवडणूकीपूर्वी या मार्गात जमिनबाधित शेतकऱ्यांना हक्काचा मोबदला मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र निवडणूकीत महसूल अधिकारी गुंतल्याने आणि पनवेलच्या प्रांतअधिकाऱ्यांच्या कार्यालयात कधी मोबदला मिळेल यासाठी खेट्या मारणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर एकच उत्तर वारंवार देण्याऐवजी प्रांत कार्यालयाने लोकसभा निवडणूकीनंतर भूसंपादनाच्या मोबदला वाटपाच्या कामाला स्थगिती दिल्याचे फलक लावला आहे. लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू झाल्यामुळे अनेक सरकारी कामे ठप्प झाली आहेत. निवडणूक आयोगाचे काम महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या खांद्यावर असल्याने निवडणूकीचे काम करण्यासाठी इतर कामांना स्थगिती देण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला आहे. मुंबई वडोदरा महामार्गाचे काम ५० टक्के पूर्ण झाल्याने या मार्गाचे काम पनवेल तालुक्यातील मोरबे गावापर्यंत जोरदार सुरु




आहे. परंतू या मार्गाचा पुढील भाग म्हणजे विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेचा पहिला टप्पा अद्याप भूसंपादन पूर्ण न झाल्याने सुरु झालेले नाही. सरकारने विरार अलिबाग मार्गिकेमधील भूसंपादन प्रक्रियेतील दिरंगाईमुळे रायगड जिल्हाधिकारी योगेश म्हसे यांच्या जागी किशन जावळे यांची नेमणूक केली. जिल्हाधिकारी जावळे यांनी रखडलेली दरनिश्चितीची प्रक्रिया काही दिवसात केली मात्र त्यानंतर लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता जाहीर झाल्याने भूसंपादनाचा मोबदला गावकऱ्यांना देण्यात तांत्रिक अडचणी उभ्या राहील्या आहेत. सध्या पनवेलचे प्रांत अधिकारी कार्यालयाकडून मोरबे गावातीला बाधित शेतजमिनींच्या मालकांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. या नोटीसीमध्ये कोणकोणती कागदपत्र सादर करावी याची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली आहेत. मोरबे प्रमाणे इतर ४३ गावांमध्ये ही प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

# भाईंदरमधील १४९ शस्त्रे पोलिसांकडे जमा; ५ जण तडीपार

**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परवानाधारकांकडून शस्त्र जमा करण्यास पोलिसांनी सुरुवात केली असून आतापर्यंत मिरा रोड व भाईंदर शहरातील १४९ परवानाधारकांनी त्यांच्याकडील पिस्तुले, रिव्हॉल्वर, बंदुका अशी शस्त्रे पोलिसांकडे जमा केली आहेत. तर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ११ जणांचे शस्त्रपरवाने रद्द करण्यात आले आहेत. स्वसंरक्षणासाठी शस्त्र बाळगणाऱ्यांना पोलिसांकडून अधिकृत परवाना दिला जातो. मिरा भाईंदर शहरातील बांधकाम व्यावसायिक, उद्योजक, तसेच काही राजकीय व्यक्तींकडे शस्त्र बाळगण्याचा परवाना आहे.अशा परवानाधारकांची संख्या १९१ इतकी आहे. निवडणूक प्रक्रियेशी ज्यांचा प्रत्यक्ष संबंध असतो, अशा व्यक्तींकडून निवडणूक प्रक्रिया सुरू असताना प्रक्रियेला गालबोट लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांच्याकडून शस्त्राचा गैरवापर होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा




परवानाधारकांकडून निवडणुकांपूर्वी शस्त्र जमा करण्यास सुरुवात केली जाते. त्यानुसार पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १ कडून मिरा भाईंदर मध्ये शस्त्र बाळगणाऱ्यांची शहानिशा करण्यात येत आहे.यात शस्त्र जमा करण्याची सूचना पोलीस ठाण्यांना देण्यात आल्यानंतर शस्त्र जमा करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. यामध्ये आतापर्यंत १९१ शस्त्र परवानाधारकांपैकी १४९ जणांनी आपले शस्त्र पोलिसांकडे जमा केले आहेत. ११ जणांनी नियमांचे उल्लंघन केल्याचे आढळून आल्यानंतर त्यावर रद्दची कारवाई करण्यात आली आहे. तर शहरातील वरिष्ठ अधिकारी, बँक आणि इतर महत्वाच्या अशा पदावर असलेल्या १९ व्यक्तींना या काळातही शस्त्र बाळगण्याची अनुमती देण्यात आली. याशिवाय उर्वरित शिल्लक राहिलेल्या शस्त्र परवानाधारकांना देखील संपर्क साधण्यात आला असून तेही लवकरच शस्त्रे जमा करणार असल्याची माहिती पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी दिली आहे. ५ जणांवर तडीपारीची कारवाई. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मिरा भाईंदर शहरात कोणतेही अनुचित प्रकार घडू देऊ नये असे, सक्त आदेश पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी दिले आहेत. या धर्तीवर पोलिसांनी शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांची यादी तयार केली आहे. यात गंभीर गुन्ह्यात सातत्याने सहभाग घेणाऱ्या ५ जणांवर आचारसंहिता घोषित झाल्यानंतर तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे. मागील आठ महिन्यात परिमंडळ १ कडून जवळपास २३ जणांवर तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे.

# समरसता मंच व विहिंपच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली आनंद कोटंबे यांची रुग्णालयात भेट

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर येथील डॉ. प्रमोद घुगे यांच्याकडून अमानवीय अत्याचार झालेल्या आनंद कोटंबे या पिडीत व्यक्तीची तो शासकीय रुग्णालयात उपचार घेत असताना सामाजिक समरसता मंच आणि विश्र्व हिंदू परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेऊन त्याला मानसिक आधार देण्याचे काम केले. डॉ. प्रमोद घुगे यांच्या लातूरस्थित आयकॉन हॉस्पिटलच्या लिफ्टचे काम करणाऱ्या आनंद कोटंबे यांना त्यांच्या कामाबद्दल नाराजी व्यक्त करत डॉ. प्रमोद घुगे यांनी आनंद कोटंबे यांचे अपहरण करून त्यांना आपल्या फार्महाऊसवर डांबून ठेवले होते. त्याच्यावर करण्यात आलेले अत्याचार अक्षरशः अमानुष प्रकारचे होते. त्यांना झालेल्या यातना, करण्यात आलेल्या अत्याचाराचा पाढाच आनंद कोटंबे यांनी या पदाधिकाऱ्यांपुढे वाचून दाखवला. डॉ. प्रमोद घुगे हा केवळ नावालाच माणूस आहे, बाकी त्याची कृती एखाद्या हिंस्र पशूसारखी असल्याची भावना यावेळी सामाजिक समरसता मंचचे निलेश गदरे यांनी बोलून दाखवली.

आनंद कोटंबे यांना डॉ.घुगे यांच्या गुंडागर्दीला न घाबरता वास्तव जे काही घडले आहे ते समाजासमोर आले पाहिजे यासाठी हिमतीने पुढे या, आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू,असा विश्र्वासही निलेश गदरे यांनी व्यक्त केला. विश्व हिंदू परिषदेचे ॲड. गौरीशंकर कौळखेरे यांनीही यावेळी आपण सगळे मिळून या प्रकरणाला वाचा फोडून पिडीत आनंद कोटंबे यांना न्याय मिळवून देऊ असे सांगितले. या पदाधिकाऱ्यांनी सदर प्रकरणाचा तपास करणारे लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे यांचीही भेट घेऊन त्यांच्याकडे डॉ.प्रमोद घुगे यांच्यावर आजपर्यंत झालेल्या तक्रारींचीही सखल चौकशी करावी, पिडीत व्यक्तीला जीवे मारण्याचा प्रयत्न झाला आहे काय याचा फॉरेन्सिक रिपोर्ट लवकरात लवकर मागवून घेऊन गुन्ह्यात भादंवि. कलम ३०७ ची वाढ करण्याची मागणीही केली. यावेळी समरसता मंचचे संयोजक शाम बलुतकर, बजरंग दल महानगराचे संयोजक सूर्यासिंग राजपूत यांचीही उपस्थिती होती.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण**, सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे**, कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे**. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

08 TO 14 APRIL 2024 - Page 5 (CRIME SANDHYA)8315:Layout 1 4/6/2024 8:07 PM Page 1



# आगम वाचनामुळे प्रत्येकाच्या जीवनात चांगले परिवर्तन शक्य

## आचार्य भगवंत श्रीमद् विजयरत्न सुंदरसुरीश्वरजी म.सा.यांचे विचार



**जळगाव/प्रतिनिधी**

आगम वाचना मुळे प्रत्येकाच्या जीवनात चांगले परिवर्तन घडेल हे निर्विवाद सत्य आहे. तीन दिवसांच्या आगम वाचना शिबिरात श्रावक-श्राविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन आचार्य भगवंत श्रीमद् विजयरत्न सुंदरसुरीश्वरजी महाराजा साहेब यांनी केले. जैन हिल्स येथे आयोजित आगम वाचना शिबिराच्या पहिल्या दिवसाच्या औपचारिक उद्घाटना प्रसंगी ते बोलत होते. जळगाव येथे होणारे हे सहावे शिबीर असून यात चारशेहून अधिक श्रावक-श्राविका सहभागी झालेले आहेत. जळगाव येथील आकाश प्रांगण, जैन हिल्स स्थित 'हिरा संस्कार छत्र' येथे जैन धर्मियांची मुख्य 'गाथा आगम वाचना' या तीन दिवसीय शिबिराचा शुभारंभ सकाळी झाला. सर्वात आधी सेवार्थी चोरडिया-जैन परिवाराच्यावतीने अशोक जैन यांनी 'ठाणांग सूत्र' ग्रंथ आचार्य भगवंत श्रीमद् विजयरत्न सुंदरसुरीश्वरजी महाराज साहेब यांच्याकडे सुपुर्त करून अर्पण केला. ते वाचन करण्याची विनंती केली. कार्यक्रम स्थळी या ग्रंथाची स्थापना झाली. भवरलाल आणि कांताबाई जैन परिवाराचे ज्येष्ठ सदस्य सेवादास दलुभाऊ जैन, अशोक जैन, अभंग अजित जैन आणि अजय ललवाणी, स्वरुप लुंकड यांच्याहस्ते मंगलदीप प्रज्ज्वलन करण्यात येऊन याच वेळी आगम पोथीचेही विमोचन करण्यात आले. जैन हिल्स येथील आयोजिलेले हे सहावे आगम वाचना शिबीर आहे. यापूर्वी बडनगर गुजरात (२०१८), शिवपूर, गुजरात (२०१९), इंदूर, मध्यप्रदेश (२०१९), भायखाळा मुंबई महाराष्ट्र (२०२०) व आंमली अहमदाबाद-गुजरात (२०२२) असे पाच शिबीरे संपन्न झाले आहेत. जैन हिल्स येथे हे शिबीर आयोजनामागची भूमिका अशोक जैन यांनी आपल्या भाषणातून श्रावक-श्राविकांपुढे मांडली. उद्घाटन समारोहाचे सूत्रसंचालन नितीन चोपडा यांनी केले. गायक सुजल शाह यांनी भक्तीगीते सादर केली. कार्यक्रम संपन्नतेसाठी संजय गांधी, देवांग दोशी, किरण जैन, अमित कोठारी आदींनी परिश्रम घेतले. आगम वाचना प्रवेशात आचार्य भगवंत श्रीमद् विजय रत्नसुंदरसुरीश्वरजी महाराजा साहेब यांनी ठाणांग सूत्र' मध्ये सांगितलेल्या १० सुखांबाबत सांगितले. यातील 'पहिले सुख हे आरोग्य' आणि दहावे 'सुख हे मोक्ष' सांगण्यात आले आहे. तीन दिवसांच्य वाचनात सकाळी ९ ते १२ आणि तद् नंतर गौराई प्रसादालयात सर्वांनी प्रसादाचा आस्वाद घेतला. दुपारी २.३० ते ४.३० अशा दोन सत्रात वाचन आणि त्याचे निरुपण समजावून सांगण्यात येत आहे. सकाळ सत्रात आचार्य भगवंत म्हणाले की, 'आरोग्य', 'वेळ', 'सम्यक दर्शन' आणि 'उपसमभाव' या विषयी सविस्तर विवेचन केले गेले. संपत्ती' की 'आरोग्य' तुम्ही कुणाला प्राधान्य द्याल? 'ठाणांग सूत्र'मध्ये आरोग्य या सुखाला पहिले स्थान दिले आहे. आजच्या बदलत्या जीवनशैलीमुळे आरोग्याच्या समस्या उद्भवल्या आहेत. कुपथ्य व अतिप्रवृत्ती यामुळे आरोग्य बिघडते. तुमचे वडील जे खात नव्हते ते आजची पुढी खाते. त्यामुळे आरोग्यावर दुष्परिणाम होतो. वेळेचे महत्त्व प्रत्येकाने जाणले पाहिजे. वेळेच्या बाबत प्रमाद आणि आळस करत असतो. निंदा करू नये असे आगम मध्ये सांगितले आहे परंतु निंदा करतो त्याला प्रमाण म्हणतात. मंदिरात जाऊन देवाची स्तुती करावी असे सांगण्यात आले आहे परंतु मंदिरात न जाणे, स्तुती न करणे याला आळस म्हटले जाते. भोजन, मोबाईल, टिव्ही बघण्यात आपला अनमोल वेळ आपण व्यर्थ घालवत असतो. मिळालेला मानवजन्म अनमोल आहे वेळेच्या सदुपयोग करायला हवा असे आवाहन देखील करण्यात आले. आगम वाचना दुपारच्या सत्रात आचार्य भगवंत श्रीमद् विजयरत्न सुंदरसुरीश्वरजी महाराज साहेबांनी क्रोध, इर्षा, कृतघ्नता आणि मिथ्या अभिनिवेश या बाबींवर 'ठाणांग सूत्र' आगममध्ये सांगितलेल्या बाबींवर भाष्य केले. अथॉरिटी आणि रिस्पॉन्सिबीलिटी या दोन शब्दांची सुंदर फोड करून सांगण्यात आली. जिथे अधिकार आला तिथे जबाबदारी येते. जबाबदारी स्वीकारली पाहिजे असे सांगून ज्या कुटुंबात प्रभावशाली विचार येत नाहीत ते कुटुंब कधीही प्रभावशाली बनत नाही. बोलणे किंवा खाणे असो रसनेवर नियंत्रण मिळविले तर सर्व बाबींवर नियंत्रण मिळविले असे समजा याविषयी विचारमंथन करून खुद्द आचार्य भगवंत श्रीमद् विजयरत्न सुंदरसुरीश्वरजी म.सा. यांनी उपस्थितांना प्रश्न विचारले ज्यांनी बरोबर उत्तर दिले त्यांना पुस्तक भेट दिले गेले. जैन हिल्स येथे शिबिरार्थींची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

# पत्नीच्या हत्येप्रकरणी पॅरोलवरून फरार आरोपीला ५ वर्षानंतर अटक


**वसई/प्रतिनिधी**



पत्नीच्या हत्येच्या आरोपाखाली तुरुंगात असलेल्या आणि संचित रजा (पॅरोल) घेऊन फरार झालेल्या एका आरोपीला वालीव पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे. तब्बल पाच वर्ष तो पोलिसांना गुंगारा देत होता. वसई पूर्वेच्या नवजीवन येथे राहणाऱ्या मोहम्मद जावेद अली हुसेन अन्सारी (२८) याने ८ डिसेंबर २०१९ रोजी पत्नी गुलिस्ता अन्सारी (२२) हिची हत्या केली होती. २०१९ मध्ये त्याला वालीव पोलिसांनी अटक केली होती. दरम्यान, करोना काळ सुरू झाला होता. तुरुंगामध्ये कैद्यांना जास्त कधी ठेवणे शक्य नव्हते. त्यामुळे अनेक आरोपींना जामीन देण्यात येत होता तसेच गंभीर गुन्ह्यातील आरोपींना संचित रजा (पॅरोल) मंजूर करण्यात येत होती. त्याचा फायदा मोहम्मद अन्सारीने उचलला. त्याने न्यायालयाकडून संचित रजा मंजूर करवून घेतली आणि बाहेर आला. त्याने नियमित न्यायालयात उपस्थित राहणे गरजेचे होते. परंतु, संचित रजा मिळताच तो फरार झाला. पोलीस त्याचा शोध घेत होते मात्र तो पोलिसांना गुंगारा देत होता. दरम्यान, त्याच्या मागावर असणाऱ्या वालीव पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेला आरोपी मोहम्मद अन्सारी वसईत लपल्याची माहिती मिळाली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयराज प्रणावरे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे (डिटेक्शन ब्रांच) सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन सानप तसेच सचिन दोरकर, मनोज मोरे, बाळू कुटे, विनायक राऊत आदींच्या पथकाने सापळा लावून आरोपी मोहम्मद अन्सारी याला अटक केली.

# उष्णता नियंत्रण कृती आराखडा तयार; नागरिकांना काळजी घेण्याचे आयुक्तांचे आवाहन

**ठाणे/प्रतिनिधी**



वाढत्या उष्णतेचा धोका लक्षात घेता, ठाणे महापालिकेने ठाणे शहरातील उष्णता नियंत्रण कृती आराखडा तयार केला आहे. यासाठी स्थापन केलेल्या टास्क फोर्स कमिटीची पहिली बैठक पार पडली. यावेळी उष्णतेच्या लाटेबाबत काळजी घेताना नागरिकांनी काय करावे व काय करू नये, उष्णतेमुळे होणाऱ्या आजारांबाबत आशासेविका यांना प्रशिक्षण देऊन याबाबतची जनजागृती नागरिकांमध्ये करण्याचे निर्देश देत नागरिकांनी देखील काळजी घ्यावी, असे आवाहन महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले. त्यामुळे या उन्हाळ्याच्या अनुषंगाने पालिकेने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. ठाणे शहराला खाडी किनारा लाभल्याने मार्च ते जूनपर्यंत वाढणाऱ्या आर्द्रतेमुळे उकाड्यात वाढ होते. साहजिकच नागरिकांना उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागतो. उष्णतेमुळे आरोग्याच्या तक्रारी वाढतात. त्यामुळे चक्कर येऊन पडणे, स्नायू अवघडणे, डोकेदुखी, श्वासाची व हृदयाच्या ठोक्यांची गती वाढणे, झटके येणे आदी त्रास जाणवतात. त्यामुळे नागरिकांना यावर काय उपाययोजना करायच्या याची माहिती देण्यात यावी. तसेच नजीकचे आरोग्य केंद्र आणि रुग्णालयांमध्ये याबाबत नोंद करण्याचे निर्देश पालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले. या बैठकीला अतिरिक्त आयुक्त १ संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.चेतना नितिल, उपायुक्त अनघा कदम, मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान उपस्थित होते. वाढत्या उष्णतेबाबत वागळे इस्टेट प्रभागात झोपडपट्ट्या व रहिवासी संकुलांमध्ये सामाजिक, आर्थिक, नैसर्गिक, भौगोलिक सर्वेक्षण करण्यात आले होते. या बैठकीत 'सेंटर फॉर एन्व्हारमेंट एनर्जी ॲण्ड वॉटर' या संस्थेने वागळे इस्टेट येथे केलेल्या सर्वेक्षणाबाबत, नागरिकांचे उषणतेच्या लाटेबाबतचे निरीक्षण व त्या अनुषंगाने करण्याच्या उपाययोजनांबाबत माहिती देण्यात आली. गेल्या काही वर्षांमध्ये उष्णतेच्या लाटेची तीव्रताही वाढत असून, रात्रीचे तापमानही वाढत आहे. त्याची झळ दैनंदिन कामकाज करताना समाजातील सर्व स्तरांना पोहोचत आहे. वागळे इस्टेट प्रभागामध्ये अंदाजे ४० टक्के लोकसंख्या ही १५ वर्षांच्या खाली आणि ६० वर्षांच्या वरील वयाची असून, त्यांच्यावर उष्णतेच्या लाटेचा परिणाम जास्त तीव्रतेने जाणवत आहे. नजीकच्या आरोग्य केंद्रामध्ये बहुतांश लोक उपचार घेतात. तसेच आशा सेविका घरोघरी नियमित पाहणी करतात. परिसरात ठिकठिकाणी पाणपोयांची संख्या वाढवणे, सार्वजनिक वाहतुकीची ठिकाणे जसे बस स्टॅण्ड, रिक्षा स्टॅण्ड या ठिकाणी सावली वाढवणे अशा उपाययोजना नागरिकांनी सुचवल्याचे या बैठकीत नमूद केले. उष्णतेमुळे होणाऱ्या आजारांबाबत रहिवासी संकुलांमध्ये माहिती पत्रके वाटणे, डिजिटल बोर्डवर सूचना प्रसिद्ध करणे, शैक्षणिक संस्थांमध्ये मुलांना वेळोवळी पाणी पिण्यासाठी सूचना देणे यांसारख्या बाबी समाविष्ट करणे, तसेच आशा सेविकेच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्याबाबतचे निर्देशही आयुक्त सौरभ राव यांनी बैठकीत संबंधितांना दिले. तसेच दर १५ दिवसांनी टास्क फोर्सची बैठक घेत, केलेल्या कामाचा आढावा घेण्याबाबतच्या सूचनाही यावेळी संबंधितांना देण्यात आल्या.

# अट्टल घरफोड्या करणाऱ्याला अटक; दहा गुन्हे उघडकीस!




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेस अट्टल घरफोड्यास अटक करण्यात यश आले असून त्याच्याकडून घरफोडीचे १० गुन्हे उघडकीस आणून ४ लाख ४८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. बबन उर्फ राजाराम धोंडीराम बुधवाडे (वय ३२, रा. बाभळगाव, जि. लातूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. हा आरोपी पोलीस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध सोलापूर, उस्मानाबाद, लातूर, बुलढाणा जिल्ह्यात तसेच तेलंगणा राज्यात मालाविषयीचे १५ पेक्षा जास्त गुन्हे दाखल आहेत. बबन बुधवाडे हा वैराग पोलीस ठाण्यामधील घरपोडीच्या गुन्ह्यात सध्या पोलीस कोठडीत आहे. जामगाव तालुका बार्शी येथील पोपट मच्छिंद्र मस्के यांच्या घरी होऊन १ लाख ३० हजार २३९ रुपये किमतीचा ऐवज चोरीस गेला होता. याबाबत वैराग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याच्या अनुषंगाने सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक हे गुन्हेगारांची माहिती घेत असताना पोलिसांना हा गुन्हा करणारा संशयित आरोपी हा लातूरचा असून तो वैराग गावातील बसस्थानकाजवळ येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती त्यावरून पोलिसांनी वैराग बसस्थानकावर सापळा लावून बबन बुधवाडे या संशयीतास ताब्यात घेतले. त्याच्याकडे करण्यात आलेल्या तपासामध्ये त्याने गेल्या दोन वर्षापासून वैराग येथील शिवाजीनगर, दत्तनगर, घोंगडे प्लॉट, खरटमल प्लॉट, भालगाव तसेच बार्शी येथील व्हनकळस प्लॉट, अलिपुर रोड, बारुंगळे प्लॉट, धसपिंपळगाव असे अनेक ठिकाणी घरफोड्या केल्याचे सांगितले. त्यावरून पोलिसांनी त्याच्याकडून विविध गुन्हयामधील ५८ ग्रॅम सोन्याचे दागिने, २३० ग्रॅम चांदीचे दागिने असा ४ लाख ४८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. तपासा दरम्यान बबन बुधवाडे याच्याकडून वैराग पोलीस ठाण्यातील सात, बार्शी शहर पोलीस ठाण्यातील तीन असे १० गुन्हे उघडकीस आले आहेत. बुधवाडे यास वैराग पोलीस ठाण्यातील गुन्ह्यातील अटक करण्यात आली असून तो पोलीस कोठडीमध्ये आहे. ही सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नागनाथ खुणे, पोलीस उपनिरीक्षक रवीराज कांबळे यांच्या टीमने केली आहे.

# देवणी तालुक्याचा तापमानाचा पारा प्रथमच गेला ४० अंशावर!

**देवणी/प्रतिनिधी**



देवणी तालुक्यात उन्हाळ्याची चाहूल लागत असताना त्या पाठोपाठ तापमानाचा पाराही चाळिशी पार करून पुढे सरकत आहे. यंदाच्या उन्हाळ्यात प्रथमच ४० अंश सेल्सियस इतक्या तापमानाची नोंद झाली आहे. मागील फेब्रुवारी अखेरपासून देवणी तालुक्याचे तापमान वाढायला सुरूवात झाली होती. चालू मार्चमध्ये पहिल्या आठवड्यात आठवडाभर तापमान ३७ अंशांच्या पुढे होते. तत्पूर्वी दिवसा उकाडा जाणवत होता. गेल्या आठवड्यापासून म्हणजेच होळी सनापासून उष्णते मध्ये वाढ होऊन सकाळपासून उन्हाचे चटके बसत असताना तापमान ३९.१ अंश सेल्सियस ओलांडत चाळिशीच्या दिशेने सरकत होता. अखेर तापमानाचा पारा ४० अंशांवर गेला आहे. या तापमानामुळे नागरिकांना उकाड्याचा त्रास जाणवत आहे. सकाळी नऊपासून उन्हाचे चटके बसत असल्यामुळे दुपारी नागरिक उन्हात फिरणे टाळत आहेत. उन्हापासून बचाव करण्यासाठी नागरिक डोक्यावर टोपी परिधान करणे पसंत केले जात असून थंड ताक, लस्सी, लिंबू सरबत, आईस्क्रिमसह थंड फलाहाराचा आधार घेतना दिसत आहेत.

# बोगस डॉक्टरच्या दवाखान्यावर उल्हासनगर पालिकेचा छापा; पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल



**उल्हासनगर/प्रतिनिधी**

कर्नाटक मधील बी.एच.एम.एस धारक असलेल्या एका डॉक्टरकडे महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथीचे नोंदणी प्रमाणपत्र नसतानाही त्याने दवाखाना सुरू केल्याचा बोगसगिरीचा प्रकार उल्हासनगर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाने मारलेल्या छाप्यात उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे नामफलक नसलेला हा ८ बेडचा दवाखाना असून याप्रकरणी डॉक्टरवर हिललाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कॅम्प नंबर ५ सेक्शन ४० मध्ये जीवनघोट हॉल समोर डॉ.भरतकुमार जैस्वाल हे बोगस वैद्यकीय व्यावसाय करत असल्याची तक्रार वैद्यकीय आरोग्य विभागाकडे प्राप्त झाली होती. त्यानुसार आयुक्त अजीज शेख यांच्या निर्देशान्वये व उपायुक्त डॉ. सुभाष जाधव, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.मोहिनी धर्मा, वैद्यकीय अधिकारी डॉ. पल्लवी पगारे यांनी पोलीस बंदोबस्तात छापा मारला. चौकशीत डॉ. भरतकुमार जैस्वाल हे कर्नाटक मधील बीएचएमएस धारक असून त्यांच्याकडे महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथीचे नोंदणी प्रमाणपत्र नसल्याची बोगसगिरी उघड झाली आहे. विशेष म्हणजे दवाखान्यावर नामफलक नसून आतमध्ये ८ बेडची आणि रुग्णांना ॲडमिट करण्याची व्यवस्था होती. याप्रकरणी डॉ. जैस्वाल यांच्यावर हिललाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील बोगस डॉक्टरची शोधम घेण्याची व त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मोहीम हाती घेण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त अजीज शेख यांनी दिली.

# मारहाण प्रकरणी एक वर्षाची शिक्षा; देवणी न्यायालयाने दिला निकाल!

**देवणी/प्रतिनिधी**

पैशाच्या कारणावरून मारहाण केल्याप्रकरणी न्यायधिश ए.पी. खोल्लम यांनी आरोपी बब्रुवान मंचक बिरादार व उदय मंचक बिरादार राहणार धनेगाव तालुका देवणी यांना एक वर्षाची शिक्षा व प्रत्येकी एक हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. या खटल्याबाबत सरकारी वकील एस आर शेख यांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी ला आरोपींनी खर्चासाठी एक हजार रुपयेची मागणी केली. ती रक्कम फिर्यादी ने देण्यास नकार दिला असताना बब्रुवान बिरादार व उदय बिरादार राहणार धनेगाव यांनी दगडाने फिर्यादिस डोक्यावर मारून व जमिनीवर पाडून लाथा बक्क्यांनी मारून जखमी केले होते. याबाबत देवणी पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा दाखल होऊन, याचा योग्य पध्दतीने तपास करून आरोपी विरोधात न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. सरकार पक्षातर्फे साक्षीदार तपासण्यात आले. त्यामध्ये फिर्यादी व डॉक्टर यांची साक्ष महत्वाची ठरली, सरकार पक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभयोक्ता शिरजोद्दिन रशीद शेख हलगरकर यांनी काम पाहिले, फिर्यादी व डॉक्टर यांची साक्ष तसेच सरकारी वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य मानून न्यायमूर्ती ए.पी. खोल्लम यांनी आरोपी बब्रुवान मंचक बिरादार व उदय मंचक बिरादार राहणार धनेगाव तालुका देवणी यांना शिक्षा ठोठावली आहे.

# वसईतील सलीम कॅसेटवाला हत्या प्रकरणी फरार आरोपीला अखेर ३६ वर्षांनी अटक!

**वसई/प्रतिनिधी**



सन १९८८ साली वसईत भर रस्त्यात झालेल्या सलीम कमाल उर्फ सलीम कॅसेटवाला याच्या हत्या प्रकरणातील फरार आरोपी क्लेमेन लोबो उर्फ मुन्ना याला माणिकपूर पोलिसांनी तब्बल ३६ वर्षांनी अटक केली आहे. हत्येनंतर तो परदेशात फरार झाला होता. ९० च्या दशकातील वसईतील विविध हत्यांमधील सलीम कॅसेटवाल्याची हत्या महत्वाची मानली जाते. ९० च्या दशकात वसई विरार शहरात दहशतीचे वातावरण होते. दिवसाढवळ्या रस्त्यावर हत्या केल्या जात होत्या. सलीम अकबर अली कमाल उर्फ सलीम कॅसेटवाला याची हत्या देखील याच काळात झाली होती. त्याचे कॅसेटचे दुकान होते आणि परिसरात त्याचा मोठा दबदबा होता. मयत सलीम कमाल हा बहुजन विकास आघाडीचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि केबल व्यावसायिक सिराज कमाल यांचा भाऊ होता. १९८८ साली सलीम वसई पश्चिमेकडील माणिकपूर रस्त्यावरील (आताच्या दत्तात्रय शॉपिंग सेंटरसमोर) पाणीपुरी खाण्यासाठी आला होता. संध्याकाळी साडेसातच्या सुमारास तो आपल्या मुलासह पाणीपुरी खात असताना ७ जणांच्या टोळीने भर रस्त्यात त्याची हत्या केली होती. पूर्ववैमन्यसातून ही हत्या करण्यात आली होती. तेव्हा वसईत फक्त वसई हेच पोलीस ठाणे होते. तत्कालीन वसई पोलिसांनी ६ जणांना अटक केली होती. मात्र सातवा मुख्य आरोपी क्लेमन लोबो उर्फ मुन्ना (आता वय ५५) हा फरार झाला होता. नंतर त्याचा काहीच ठावठिकाणा लागला नाही. कालांतराने हे प्रकरण थंड झाले होते. माणिकपूर पोलिसांनी या प्रकरणाचा नव्याने तपास सुरू केला होता. फरार आरोपी क्लेमेन लोबो हा परदेशातून वसईत आल्याची माहिती मिळताच पोलिसांनी त्याला अटक केली. त्याला पुढील तपासासाठी वसई पोलीस ठाण्याकडे सुपूर्द करण्यात आले आहे, अशी माहिती माणिकपूर पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक राजू माने यांनी दिली.

# देवणी केमिस्ट ड्रगिस्ट असोसिएशनतर्फे बिलाल मस्जिदमध्ये इफ्तार पार्टी

**देवणी/प्रतिनिधी**



देवणी शहरातील बस स्टँड जवळील बिलाल मस्जिद येथे देवणी शहरातील केमिस्ट ड्रगिस्ट मेडिकल असोसिएशनच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मेडिकल असोसिएशनचे देवणी तालुकाध्यक्ष उद्धवजी मल्लेशे, सुनील बावगे, सचिन मंगनाळे, आदित्य पाटील, बस्वराज इश्वरशेट्टे, जहागिरदार, उमाकांत डोंगरे, सुभाष पाटील, धनराज म्हेत्रे, रौफ तांबोळी, अजीज खेडे, रोट्टे सुमित, मौलाना हापिज आलम खान इमामो खतीब बिलाल मस्जिद देवणी, मगदूम पठाण, डॉ.अजहर मिर्झा, डॉ इफरोज तांबोळी, डॉ.पठाण, गुलाम रसूल काझी, पत्रकार शकील मनियार, आतिक शेख, शेरखान मनियार, तौफिक सय्यद, सुलतान शेख, यांच्या सह अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होते.

08 TO 14 APRIL 2024 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 4/6/2024 8:07 PM Page 1



पान १ वरून....

## दोन कुटुंबातील वाद प्राणावर...

परिवारातील तरूण एका गुन्ह्यात अडकला, तेंव्हा त्याने साथीदार म्हणून दुसऱ्या परिवारातील तरूणालाही गुन्ह्यात अडकवले. साहजिकच आपल्या भावाला नाहक गुन्ह्यात अडकवल्यामुळे संतप्त झालेल्या मोठ्या भावाने त्या तरूणाला मारहाण केली. हीच मारहाण पुढे वाद धुमसत ठेवण्याचे कारण बनली. त्या तरूणाचा खून करण्यापर्यंत हे प्रकरण येऊन ठेपले. भररस्त्यात खून करणाऱ्या त्या टोळक्याला पोलिसांनी जेरबंद केले आहे. एके काळी संपूर्ण महाराष्ट्रात शांतताप्रिय शहर म्हणून ज्या धुळे शहराची संपूर्ण महाराष्ट्रात ख्याती होती. ते धुळे शहर आज गुन्हेगारीच्या सारीपाटावर अग्रभागी झळकू लागल्याने बुजुर्ग धुळेकर खंत व्यक्त करतांना दिसत आहेत. मला आवडेल त्या महिलेशी मी शरीरसंबंध ठेवले अशी जिद्द ज्यागुड्डुया नामक गावगुंड्याने बाळगली होती. त्या जिद्दीप्रमाणे जो धुळ्यातआपल्याशारिरीक ताकदीच्या जोरावर वागू लागला होता. त्या गुड्डुयाची पहाटेच्या वेळी एका हॉटेलात खुलेआम हत्या करण्यात आलीहोती. या अतिशय निर्दयी घटनेने केवळ महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण भारत हादरला होता. रावसाहेब पाटील नावाच्या बलदंड शरीराच्या उमद्या इसमाची देवपुरात त्याच्या तरूण मुलासह भरदिवसा सर्वासमोर हत्या करण्यात आली होती. ऑक्टोबर २०२३ मध्ये संपूर्ण जिल्ह्यात प्रसिद्ध असलेल्या धुळे शहरातील गोल चौकी पोलीस स्थानकासमोरून शुभम साळुंके या तरूणाचे सर्वासमक्ष अपहरण करून वरखेडा रोडवर त्याला यमसदनी पाठवण्यात आले, तर आता दि. ४ मार्च २०२४ रोजी सहजीवननगरमध्ये रहाणाऱ्या अमोल गुलदगडे यातरूणावरसामुदायिक प्राणघातक हल्ला करून त्याला संपवण्यात आले. धुळे शहरातील शासकीय दुध डेअरी परिसरातील सहजीवननगर परिसरात आणि लक्ष्मीवाडी परिसरात रहाणारे गुलदगडे परिवार आणि मेढे परिवार हे एकमेकांशी चांगले परिचित आहेत. एकमेकांशी त्यांचे सख्यही होते. सुख-दुः खात ते एकमेकांच्या मदतीला धावूनही येत असत, पण ऑक्टोबर २०१८ मध्ये त्यांच्या संबंधात कारणपरत्वे मीठाचा खडा पडला आणि दोन परिवार एकमेकांचे शत्रू बनले. हर्षल मेढ़े याच्यावर डिसेंबर २०१८ साली एक गुन्हा दाखल झाला होता. त्या गुन्ह्यात पोलिसांना जाबजबाब देतांना हर्षल मेढे याने सहजीवन नगरात वास्तव्याला असलेल्या ऋषीकेश गुलदगडे या तरूणाला गुंतवले होते, त्यामुळे ऋषीकेश याच्यामागे पोलिसांचा सतत ससेमिरा असतो. ऋषीकेश याचा संबंधित गुन्ह्याशी संबंध नसतांना हर्षलने त्या गुन्ह्यात अडकवले म्हणून ऋषीकेशचा मोठा भाऊ अमोल छगन गुलदगडे याने संतापाच्या भरात हर्षलला मारहाण केली होती.

अमोलने हर्षलला मारहाण केल्याचे शल्य त्या दिवसांपासून मेढे परिवाराला बोचत होते. या मारहाणीचाबदला घ्यायचाच असा ठामनिर्धार मेढे कुटुंबीयांनी केला होता. त्या दिवसापासून ते अमोलला संपवण्याची संधी पहात होते. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या मेढे कुटुंबीयांच्या मनात बदल्याची भावना आहेयाची सुतराम कल्पना गुलदगडेकुटुंबीयांना नव्हती. नोकरी आणि मोलमजुरी हे त्यांचं उत्पन्नाचं साधन. अमोल गुलदगडे हा कुटुंबातील कर्ता-सवरता मुलगा असल्याने कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची मुख्य जबाबदारी त्याच्यावर होती. धुळ्यातील औद्योगिक वसाहती परिसरातील अवधान येथील टोल नाक्यावरील पेट्रोलिंगच्या गाडीवर अमोल हा नोकरीला होता. फावल्या वेळेत तो जमेल त्या पद्धतीने समाजसेवेत सहभाग घेत असायचा. दि. ४ मार्च २०२४ रोजी सहजीवन नगर परिसरातील छोरियानगरमध्ये रात्रीच्या क्रिकेटच्या स्पर्धा आयोजितकरण्यात आल्या होत्या. यास्पर्धा पहाण्यासाठी अमोल गेला होता. अमोलचा लहान भाऊ ऋषीकेशला त्याच्या मित्रांनी आग्रह केल्याने तोसुद्धा आपल्या मित्रांसह रात्रीच्या क्रिकेट मॅचेस पहायला छोरियानगरात गेला होता. रात्री बारा वाजता मॅचेस संपल्यानंतर ऋषीकेश आणि त्याचे सवंगडी घरी परतत असतांना सहजीवन नगरमधील महादेव मंदिराजवळ थांबले. गप्पा-गोष्टी करत असतांना काही 'अंतरावरून त्यांना भांडणाचा,शिवीगाळ, 'हाणा... मारा... सोडू नका' असा आवाज आला. या आवाजाचा वेध घेत ऋषीकेश आणि त्याचे मित्र त्या दिशेने धावले. नवनाथ मंदिराजवळ गर्दी होती आणि चार-पाच जण एकाला घेरून मारत होते. ऋषीकेश आणि त्याचे मित्र त्याजागी गेले असता त्यांनीपाहिलेले दृष्य भयानक होते.ऋषीकेशचा मोठा भाऊ अमोल यालाच मारेकरी प्राणघातक हत्यारांनी मारत होते. अमोलला घेरून मारणाऱ्यात आदित्य मेढे, हर्षल मेढे, राजू मेढे, जयेश उर्फ गोलू धापे व गुणवंत सोनावणे यांचा समावेश होता. ऋषीकेश आणि त्याचे मित्र सर्व हल्लेखोरांना ओळखत होते, कारण सर्वच हल्लेखोर सहजीवन नगरातीलच होते. अमोल हा कसलेला तरूण होता. तो सावध असता तर चार जणांना भारी होता, पण तो अगदी बेसावधहोता आणि त्याला कल्पनानव्हती की घेरून त्याच्यावरसशस्त्र प्राणघातक हल्ला होईल. ऋषीकेश आणि त्याचे मित्र अनावधानाने घटनास्थळी पोहोचले, तेंव्हा आदित्य मेढे हा आपल्या हातातील धारदार प्राणघातक शस्त्राने अमोलचा गळा कापत होता. गळा कापला जाताच तो रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर कोसळला. अमोल रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर आडवा पडताच हर्षल मेढे हा अनमोलच्या छातीवर बसला आणि स्वतः खिशातील हातरूमाल काढून त्या हातरूमालाने अमोलचागळा आवळू लागला. त्याच दरम्यान राजू मेढे हा भला मोठा दगड अमोलच्या पायावर टाकून त्याचा पाय जायबंदी करत होता. गुणवंत सोनावणे हा आपल्या हातातील प्राणघातक हत्यारानेअमोलला घाणेरड्या पद्धतीच्या शिव्या देत सर्वांगावर जखमा करत होत्या. जयेश उर्फ गोलू धापटे हा आपल्या हातातील लाकडी दांडक्याने अमोलवर घणाघाती प्रहार करत होता. असहाय्य अमोल जनावराप्रमाणे आकांत करत असतांनाच त्याची प्राणज्योत मालवली व तो कायमचा शांत झाला. अमोलच्या भावाला आणि त्याच्या मित्रांना पहातांच पाचही हल्लेखोर फरार झाले. अमोलचा प्राण वाचणे महत्त्वाचे असल्याने हल्लेखोराना प्रतिकार करण्याऐवजी ऋषीकेशने व त्याच्या मित्रांनी रक्तबंबाळ अवस्थेतील अमोलला तात्काळ हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रूग्णालयात उपचारार्थ नेले, मात्र त्याअगोदरच अमोलची प्राणज्योत मालवली होती असे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले. रात्री एक वाजण्याच्या दरम्यान पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपअधीक्षक ऋषीकेश रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन हिरे,स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे, धुळे शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धीरज महाजन आदींनी आपआपल्या फौजफाट्यासह घटनास्थळी धाव घेतली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता श्रीकांत धिवरे यांनी रात्रभर जागरण करत संवेदनशील भागात तात्काळ पोलीस बंदोबस्त तैनात केला. घटनेच्या गांभीर्याचा गैरफायदा घेत समाजातील असामाजिक घटकांना शांतता व सुव्यवस्था बिघडण्यास वाव मिळू नये म्हणून शहरातील सर्वच पोलीस स्टेशनच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सावध केले. शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धीरज महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली कायद्याच्या चौकटीत घटनेचा व घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला. चोख पोलीस बंदोबस्तात अमोलच्या मृतदेहावर गंभीर व शोकाकुल वातावरणात अंत्यविधी उरकण्यात आला.अमोल गुलदगडे याचा लहान भाऊ प्रत्यक्षदर्शी साक्षीदार ऋषीकेश गुलदगडे याने घटनेची पार्श्वभूमी नमूद करून मागील घटनेचा वचपा काढण्यासाठीपाच हल्लेखोरांनी अमोलवर कसा प्राणघातक हल्ला केला याचे वर्णन करून पाचही आरोपींच्याविरोधात खुनाची फिर्याद दाखल केली. या फिर्यादीच्या आधारे धुळे शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धीरज महाजन यांनी भा.दं.वि. ३०२, १४३, १४७, १४८, १४९, ३२३, '५०४, ५०६ सह मुंबई पोलीस कायदा कलम ३७ (१), (३) अन्वये उपरोक्त पाचही हल्लेखोरांविरूद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला. धुळे शहर पोलीस स्टेशनलाअमोल गुलदगडे या तरूणाच्या खुनाचा गुन्हा दाखल होताच धुळे शहर पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या शोध पथकाचे अधिकारी-कर्मचाऱ्यांना पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी कार्यमग्न केले आणि अल्पावधीत हल्लेखोरांना ताब्यात घेतले.

दरम्यान अमोल गुलदगडे यांच्या आजी, आई, पत्नी, भाऊ आदी नातेवाईकांना घेवून सहजीवन परिसरातील, लक्ष्मीवाडी परिसरातील नागरिक बहुसंख्येने जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या कार्यालयात गेले. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी पिडीत कुटुंबाला आधार देत, सहयोग दिल्याबद्दल पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांचे व पोलीस यंत्रणेचे आभार मानत हल्लेखोरांना संघटीत गुन्ह्याचे कलम लावून जन्माची अद्दल घडवा अशा आशयाचे निवेदन दिले. अमोल गुलदगडे हाहोतकरू तरूण होता. प्रसंगी तो गरजवंताच्या मदतीला जायचा. मेढे परिवार आणि त्यांचे सहयोगी यांची सर्वांची पार्श्वभूमी गुन्हेगारी स्वरूपाची आहे.

विविध पोलीस स्टेशनला या हल्लेखोरांच्या विरोधात विविध प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. शासकीय दूध डेअरी परिसरात, सहजीवन नगर, लक्ष्मीवाडी आदी भागात मेढे परिवाराने आपल्या गुन्हेगारी प्रवृत्तीने दहशत निर्माण केली होती. त्यांची दहशत कमी व्हावी म्हणून अमोल गुलदगडे प्रसंगी मर्दपणा घेवून पिडीत कुटुंबीयांच्या मदतीला धावून जात असायचा, त्यामुळे मेढे परिवार अमोल गुलदगडेंवर खार खात असे असे मतही जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देतांना परिसरातील नागरिकांनी बोलून दाखवले. मेढे कुटुंबीय गुन्हेगारी प्रवृत्तीचे असल्याने त्यांच्याविरोधात किती? कुठे? कसल्या प्रकारचे गुन्हे दाखल आहेत यांची पुराव्यादाखल जंत्रीच मोर्चेकऱ्यांनी पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांना सादर करून पाचही हल्लेखोरांना संघटीत गुन्हेगारीचेकलम लावून कायम स्वरूपाची अद्दल घडवा असे आवाहन केले. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांना निवेदन देतांना अमोल गुलदगडेची वयोवृद्ध आजी, आई, पत्नी, भाऊ, दोन वर्षाची चिमुकली मुलगी आदी आप्तेष्ट आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अनैसर्गिक कृत्यास त्याने नकार...

विकृती असणारे होते. त्यांनी डाव साधण्याचे ठरवले. त्या गृहस्थाला दारू पाजून निर्जनस्थळी घेऊन गेले आणि जबरदस्ती करू लागले. त्याने जोरदार विरोध केला असता चिडलेल्या त्या दोघांनी त्याचा जीव घेतला. अहमदनगर शहराजवळीलनवनागापूरमधील गजाननकॉलनीतील एका छोट्या घरात सुमन कमलाकर शेळके (वय ७०) या त्यांचा थोरला मुलगा संदीप (वय ४४) याच्यासह रहाण्यास होत्या. संदीप यांची पत्नी २०११ साली आजारपणात मयत झाली आहे.त्यांना मूलबाळ वगैरे नाही. संदीप हा कोपरगाव पंचायत समितीत कनिष्ठ लिपिक म्हणून नोकरी करतो. त्याला दारूचे व्यसन आहे, त्यामुळे त्याचे कामावर फारसे लक्ष नाही. कित्येक वेळा तो कामाला दांड्या मारत असतो. त्याला दोन वर्षापूर्वीसततच्या गैरहजेरीमुळे नोकरीवरून बडतर्फ केले आहे, तेंव्हापासून संदीप वत्याची आई हे दोघेजण नवनागापूर येथे रहात होते. संदीपला त्याचा भाऊ संतोष याने वापरण्यासाठी एक मोबाईल घेवून दिला होता.मात्र त्याने तो दारूसाठी विकला होता. असे त्याने कित्येक वेळा केल्याने सध्या त्याच्याकडे कोणताही मोबाईल नाही. संदीपचा धाकटा भाऊ संतोष (वय ४२) हा नवनागापूरजवळीलच नागापूर येथील बोल्हेगाव फाट्याजवळच्या राजलक्ष्मी अपार्टमेंटमध्ये त्याच्या कुटुंबीयासह रहाण्यास आहे. संतोष हा आदिवासी विकास विभागाअंतर्गत पाईप लाईन रोड, सावेडा, अहमदनगर येथील आदिवासी मुलांच्या शासकीय वसतीगृहात गृहपाल पदावर नोकरीस आहे. वयोवृद्ध सुमन शेळके यांच्या दोन मुलांची अशी परिस्थिती होती. थोरला संदीपच्या व्यसनामुळे घरात माणसे कमी असूनही त्यांना नाईलाजास्तव जवळच पण दोन वेगवेगळ्या ठिकाणी रहावे लागे. संतोष हा त्याच्या पत्नी मुला-बाळांमध्ये मग्न होता.मात्र आपले कर्तव्य म्हणून अधून-मधून आई व भावाची विचारपूस करत होता. त्यांची ख्यालीखुशाली विचारत होता. गुरूवार दि. २२ फेब्रुवरी २०२४ रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास संतोषला त्याच्या आईने फोन करून सांगितले की, बाळू (म्हणजेच संदीप) हा दि. २१ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी साडेबारा वाजल्यापासून घरातून बाहेर गेला असून तो अजून घरी आलेला नाही. तो कुठे गेला आहे याचा शोध घे. आईचा असा फोन आल्याने संतोषने हातातील सर्व कामे सोडून संदीपचा शोध घेण्यास सुरूवात केली. त्याने सुरूवातीलासंदीपचे दारूचे अड्डे, त्याचे मित्रत्यांचा ठावठिकाणा शोधायला सुरूवात केली. गजानन कॉलनीतील हॉटेल, इतर दारूची ठिकाणं याठिकाणी संतोषने संदीपची चौकशी केली असता तेथील लोकांनी दोन दिवसांपासून संदीप त्यांच्याकडे आला नाही असे सांगितले. आणखी दुकानदार व कॉलनीतील लोकांकडे चौकशी केली असता त्यांनीही संदीप दोन दिवसांपासून दिसलाच नाही असे सांगितले. संतोषने घरी येऊन आई सुमनबाई हिला संदीप सापडत नसल्याचे सांगितले. त्यावर उद्यापर्यंत वाट पाहू आणि नंतर पोलिसात तक्रार देवू असे त्या दोघांचे ठरले.त्यामुळे आई घरातील तिच्या उद्योगाला लागली अन् संतोष त्याच्या नोकरीवर निघून गेला. दि. २३ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास संतोष त्याच्या नोकरीवर होता. त्यावेळी त्याला पोलिसांचा फोन आला की अहमदनगर एम.आय.डी.सी.तील बंद पडलेल्या सह्याद्री कंपनीच्या पडक्या इमारतीमध्ये एक इसम मृतावस्थेत पडला असून तो तुमचा भाऊ असल्याची माहिती मिळाली आहे तरी आपण खात्री करण्यासाठी येथे या. हा फोन आल्यानंतर आईला पुसटशी कल्पना देवन संतोष पोलिसांनी सांगितलेल्यापत्त्यावर निघाला. काही वेळातच संतोष पोलिसांनी सांगितलेल्या घटनास्थळी पोहोचला. अहमदनगर एम.आय.डी.सी.तील बंद पडलेल्या सह्याद्री कंपनीच्या पडक्या इमारतीत जावून पाहिले असता त्याठिकाणी संतोषचा भाऊ संदीप हा मृतावस्थेत- पडला होता. त्याचे डोके व चेहरा दगडाच्या सहाय्याने चेंदामेंदा केला होता. त्याच्या डोक्याच्याखाली रक्ताचे थारोळे साचले होते. तसेच त्याच्या गळ्यावर, छातीवर व पोटावर काळे-निळे लालसर व्रण दिसत होते. तसेच त्याच्या गळ्याभोवती नायलॉन पट्टीने त्याचा गळा आवळल्यासारखा व्रण दिसतहोता. एम.आय.डी.सी. पोलिसांनी घटनास्थळाचा तसेच मृतदेहाचा पंचनामा केला. एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी व पोलीस पथक ॲम्ब्युलन्समधून संदीपला अहमदनगर येथील सिव्हीलहॉस्पिटलमध्ये घेवून गेले. डॉक्टरांनी तो मृत झाल्याचे सांगितले. संदीप याला कोणीतरी अज्ञात व्यक्तीनेअज्ञात कारणावरूननायलॉन पट्टीने गळा आवळून व दगडाच्या सहाय्याने डोक्याचा व चेहऱ्याचा चेंदामेंदा करून त्याला ठार मारले अशा आशयाची फिर्याद संतोष कमलाकर शेळके यांनी एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात दिली, त्यानुसार गुन्हा रजि. नं. १६९/२०२४ भा.दं.वि. ३०२, २०१ कलमानुसार दि. २३ फेब्रुवारी रोजी गुन्हा नोंद झाला. दोन दिवसांपासून अहमदनगर एम.आय.डी.सी.तील बंद पडलेल्या सह्याद्री कंपनीत एका इसमाचा मृतदेह पडून रहातो. त्याची खबर कोणाला नसते. या गोष्टीची गांभीर्याने दखल घेवून पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना या घटनेचा तपास करण्याचे आदेश दिले. एल.सी.बी.चे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांनी गुन्हा दाखल झाला त्याच दिवशी दि. २३ फेब्रुवारी २०२४ रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात, हवालदार रविंद्र कर्डिले, विशाल दळवी, भीमराज खर्से, शेख, देवेंद्र शेलार, विजय ठोंबरे, सागर ससाणे, आकाश काळे, प्रशांत राठोड, अर्जुन बडे यांचे पथक नेमून खुनाच्या गुन्ह्याचा तपास करून गुन्हा उघडकीस आणण्याबाबत सुचना देवून पथकास रवाना केले. एम. आय. डी.सी. पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरीतसेच एल. सी.बी.च्या पथकाने लगेच घटना घडली त्याठिकाणी आजूबाजूस रहाणाऱ्या लोकांकडे तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करत असतांना पोलिसांना महत्त्वाची माहिती मिळाली. दि. २१ फेब्रुवारी २०२४ रोजी संदीप शेळके हा विशाल जगताप व साहिल पठाण (दोघेही रहाणार एम.आय.डी.सी.) यांच्यासोबत बऱ्याच वेळपर्यंत देशी दारूच्या दुकानात दारू पित बसलेला होता अशी खात्रीशीर माहिती प्राप्त झाली होती, त्यानुसार एम.आय.डी.सी. पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने विशाल जगताप व साहिल पठाण यांचा त्यांच्या रहात्या घरी तसेच आजूबाजूस शोध घेतला, तेंव्हा दोन दिवसांपासून ते दोघेही घरी नसल्याची माहिती मिळाल्याने पोलिसांचा त्यांच्यावरील संशय बळावला. पोलीस पथकाने त्या दोघांकडच्या मोबाईलच्या आधारे तांत्रिक विश्लेषण केले असता दोघेही संशयित इसम शहाजंग मोहल्ला, जि. आग्रा (उत्तरप्रदेश) येथे असल्याबाबत खात्री झाली. पथकाने त्याठिकाणी जावून संशयितांचा शोध घेतला असता ते दोघे जण मिळून आले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेवून त्यांची नावे विचारली असता त्यांनी आपली नावे विशाल चिंतामण जगताप (वय २२) रा. चेतना कॉलनी, एम.आय.डी.सी. अहमदनगर व साहिल शेरखान पठाण (वय २०) रहाणार तेडोळी मळा, नागापूर, एम.आय.डी.सी. अशी सांगितली. त्यांना ताब्यात घेवून अहमदनगर येथे आणले. त्यांना न्यायालयासमोर उभे करून पोलीस कोठडी घेण्यात आली. पोलीस कोठडीत दोघांकडे गुन्ह्यासंदर्भात विचारणा केली असता त्यांनी आपण संदीप शेळके याचाखून केल्याचे कबूल केले. संदीप शेळके याला गेल्या अनेक वर्षापासून दारूचे व्यसन जडले होते. त्या व्यसनापायी त्याला शासकीय नोकरीला मुकावे लागले होते. तो आई सुमनबाई हिच्यासोबत नवनागापूर येथे रहात होता. दररोज सकाळ-संध्याकाळ देशी दारूच्या अड्ड्यावर जावून दारू पिणे हाच त्याचा एकमेव उद्योग होता. या दारूच्या व्यसनामुळे संदीपची ओळख साहिल पठाण आणि विशाल जगताप यांच्याशी झाली होती. ते नेहमीच त्याच्यासोबत दारू प्यायला दारू अड्डयावर असायचे. दि. २१ फेब्रुवारी २०२४ रोजी संध्याकाळी संदीप शेळके, विशाल जगताप, साहिल पठाण असे सर्व जण नेहमीप्रमाणेच दारू प्यायला सोबत बसले. आज त्या दोघांच्या मनात वेगळेच शिजत होते. त्यांनी संदीपला जरा जास्तच दारू पाजली. दारू पाजल्यानंतर दोघे जण संदीपला घेवून एम.आय.डी.सी.तील बंद पडलेल्या सह्याद्री कंपनीच्या पडक्या इमारतीत आले. तेथे आल्यावर त्यांनी त्याच्या अंगावरचे कपडे काढण्याचा जोरजबरदस्तीने प्रयत्न केला. त्याच्याबरोबर त्यांना अनैसर्गिक संभोग करायचा होता. संदीपने त्यांना जास्तच विरोध केल्याने त्यांनी नायलॉन पट्टीने गळा आवळून त्याचा जीव घेतला. त्याची ओळख पटू नये म्हणून दगडाने त्याने डोके अन् तोंड चेचून काढले. संदीपचा त्यांनी खून केल्यानंतर थोड्या वेळाने त्यांची दारू उतरली. मिळेल त्या वाहनाने ते उत्तरप्रदेश येथे पळून गेले, मात्र पोलिसांनी त्या दोघांना आग्रा येथून शोधून काढले. सध्या ते न्यायालयीन कोठडीत आहेत.

## विकृत सासू विरोधात सूनेने केली अखेर फौजदारी तक्रार

**पनवेल/प्रतिनिधी**

सासू व सूनेचा वाद अगदी विकोपाला गेल्याच्या अनेक घटना आपण ऐकल्या व पाहिल्या असतील मात्र दोन दिवसांपूर्वी खांदेश्वर पोलीस ठाण्यात एका सूनेने केलेल्या फौजदारी तक्रारीत सासूच्या विकृतपणाचा धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे. ही घटना मुंबई येथील चुनाभट्टी येथे घडली असून या सर्व प्रकारामध्ये भरडलेल्या पिडीत शिक्षिकेने ही तक्रार नोंदविली आहे. दोन वर्षांपूर्वी ३३ वर्षीय पिडीतेचा विवाह मुंबई शीव (चुनाभट्टी) येथे राहणाऱ्या ३८ वर्षीय तरुणासोबत झाला. सासू सासरे आणि पती यांच्यासोबत पिडीता राहत होती. पिडीतेने दिलेल्या तक्रारीमध्ये पतीने इच्छेविरुद्ध अनैसर्गिक शारीरीक संबंध जबरदस्तीने ठेऊन त्रास दिला. मात्र त्याहून भयानक प्रकार सासूने केला. ५७ वर्षांच्या या सासूने या सर्व बलात्कार होतानाचे छायाचित्र काढले. पिडीतेने या धक्कादायक प्रकाराची तक्रार दिल्यावर तक्रार लिहून घेणारे पोलीसही अवाक झाले आहेत. वारंवार हा सर्व प्रकार सहन करुन पिडीता या कुटूंबासोबत मागील वर्षी एप्रिल महिन्यापर्यंत नांदली. मात्र हे सर्व असह्य झाल्यावर त्या पिडीतेने पोलीस ठाण्याचे दार ठोठावले. संबंधित प्रकार खांदेश्वर पोलीस ठाण्यात ३० मार्च रोजी नोंदविल्यानंतर तो मुंबई पोलीसांकडे वर्ग केला आहे. पोलीस याबाबत पुढील तपास करीत आहेत.

साप्ताहिक क्राईम संध्या ऑनलाईनही वाचता येईल....
www.crimesandhya.com

पान ८ वरून....

### वसई न्यायालयात ऐतिहासिक ...

अभिमानाने व कुतूहलाने ते पाहिले. दरम्यान वसईला ऐतिहासिक वारसा आहे. इतिहासाचा जागर व्हावा, या कारणास्तव आणि वकिलांना प्राचीन नाणी पाहण्यासाठी एकाच ठिकाणी संधी मिळावी, या हेतूने प्रदर्शनाचे आयोजन केले होते, असे आयोजक ॲड. आनंद घरत यांनी सांगितले, तर इतिहास पुढच्या पिढीला समजावा, अर्थव्यवस्थेत कशाप्रकारे बदल घडले, जुन्या नाण्यांची माहिती, इतिहासदेखील मांडण्यात आल्याने परिपूर्ण अभ्यासाला दिशा मिळाली, असे ॲड. पूनम जाधव सांगितले. तसेच आजच्या धकाधकीच्या जगात इतिहासाचा ठेवा लोकांना ज्ञात होण्यासाठी समाजात काम केले जात आहे, हे वाखाणण्यासारखे आहे. पूर्वी कशाप्रकारे आर्थिक जीवन होते व सद्य:स्थितीत आलेले बदल याची माहिती मिळत आहे. असे नाणे प्रदर्शन विविध ठिकाणी भरवले पाहिजे, असे ॲड. भरत पाटील यांनी आपले मत व्यक्त केले.

### लातूर येथील डॉ.घुगे यांचे वैद्यकीय ...

दाद देत नव्हते.अखेर सामाजिक संघटनेने प्रशासनावर दबाव वाढविल्याने त्यात कारवाई झाली पण अजूनही तीन-चार दिवस झाले तरीही डॉ.घुगे यांना पोलिसांकडून अटक होत नाही. एवढा अमानुष अत्याचार झाल्यानंतरही त्यांच्यावर ३०७ सारखा गुन्हा नोंद होत नाही, यासाठी समाज बांधवांच्या वतीने जिल्हाधिकारी लातूर यांना २ एप्रिल रोजी दिलेल्या निवेदनात आरोपी डॉ. प्रमोद घुगे यांचे वैद्यकीय शिक्षणाचे प्रमाणपत्र व त्यांच्या हॉस्पिटलचा परवाना रद्द करावा अशा आशयाचे निवेदन दिले आहे. याची प्रत माननीय मुख्यमंत्री, माननीय गृहमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्ष नेते, माननीय पालकमंत्री,माननीय स्थानिक आमदार अमित देशमुख, माननीय पोलीस अधिक्षक,माननीय आयुक्त मनपा यांच्याकडेही देण्यात आल्याची यात नमूद केले आहे. या निवेदनावर सर्वश्री अशोक देडे, संतोष मस्के, दशरथ मस्के, गोरोबा लोखंडे, नारायण कांबळे, शिरीष दिवेकर, सुभाष सूर्यवंशी, अंगद वाघमारे , गायकवाड बी .पी., मोहन शिंदे, सूर्यवंशी बी. पी., आनंद वैरागे, के.के.मुखेडकर, भानुदास कुडके, रामलिंग भडंगे, मारुती माने, दिनकर मस्के, संतोष पटनुरे, प्रवीण जोहारे, नागनाथ कलवले,तुकाराम केदासे, डॉ.शिवाजी जवळगेकर, मोहन सुरवसे, पी.के. सावंत आदीसह समाज बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### पालघर जिल्ह्यातील नागरीकांनी...

परिसरातील महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यार्थी, पत्रकार बंधु व इतर मान्यवर उपस्थित होते. मे महिना हा विद्यार्थ्यांसाठी सुट्टीचा महिना असल्याने विविध कौटुंबिक कार्यक्रम या महिन्यामध्ये आयोजित करण्यात येतात. या मध्ये मतदानासाठी वेळ काढून नागरिकांनी राष्ट्रीय कर्तव्याला प्राधान्य द्यावे. शिक्षक वर्गानी सुध्दा मतदान करण्याविषयी महाविद्यालयातून जनजागृती करून पालघर लोकसभेतील मतदानाची टक्केवारी वाढवावी. लोकशाहीचा महत्वाचा टप्पा मतदान करणे हा आहे. डतएएझ लीर्ळींळीू अंतर्गत जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी मतदार जनजागृती करण्यात येणार आहे. यामुळे निश्चितच पालघर मतदार संघातील मतदान ८० टक्केच्या वरती जाईल असा विश्वासही जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी व्यक्त केला.

### मतदारांना मतदानादिवशी ...

ऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत देता येईल. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन तासांची सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापनांनी घेणे आवश्यक राहील. वर नमूद केल्यानुसार उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व महामंडळे, उद्योग समूह, कंपन्या व संस्थांमध्ये, औद्योगिक उपक्रम इत्यादींच्या आस्थापनांनी वरील सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल, याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी. मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास, संबंधिता विरुध्द योग्य कारवाई करण्यात येईल, असा इशाराही या मध्ये देण्यात आला आहे. हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या् .ारहरीरिहींर.सीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०२४०३२२१७१०३६२८१० असा आहे.

### नूतन लातूर जिल्हा ग्रंथालय ...

यांनी आपण लातूर जिल्ह्यात सर्वाच्या सहकार्याने ग्रंथालय चळवळ वृद्धिंगत होण्यासाठी प्रयत्नशील राहू केला. संजय मस्के यांनी आपले मनोगत व्यक्त करताना लातूर जिल्ह्याची सार्वजनिक ग्रंथालय चळवळ राज्यात अग्रेसर अशी असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीधर स्वामी यांनी तर आभार राम मोतीपवळे यांनी मानले. कार्यक्रमास जिल्हा ग्रंथालय संघाचे संचालक जहांगीर सय्यद, नंदकुमार घोगरे, संतोष करमले, सुशिल मेकले, ग्रंथालय निरीक्षक हरिश्चंद्र डेंगळे, वरिष्ठ लिपिक हिरालाल पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

### पाणी टंचाई प्रदेशातील पाण्याचे ...

ऑक्टोबरमध्ये सर्वेक्षण केले जाते. यामध्ये ग्रामपंचायत परिसरातील सर्व सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण करणे, ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध असलेल्या क्षेत्रीय तपासणी संच वापर करुन प्रत्यक्ष स्त्रोताच्या ठिकाणी जाऊन नमुन्यांची तपासणी करणे, ग्रामपंचायतीमध्ये ठेवण्यात आलेल्या टी.सी.एल. पावडर साठवण ठेवण्याची पद्धत, तसेच नोंदवही व प्रत्यक्ष वापर होतो की नाही, त्याची तपासणी करण्यात येणार आहे.

स्वच्छता सर्वेक्षण अभियानात स्त्रोत व स्त्रोतांच्या आजूबाजुचा परिसर स्वच्छता करुन घेणे व जवळपास राहणाऱ्या कुटुंबाशी संवाद साधणे, लाल कार्ड व पिवळे कार्ड प्राप्त ग्रामपंचायतींची विशेष तपासणी करुन प्राप्त असणाऱ्या पिवळ्या कार्डाचे हिरव्या कार्डात रुपांतर होण्यासाठी विशेष प्रयत्न करणे, स्वच्छता सर्वेक्षण कालावधीत तीव्र जोखीम, मध्यम जोखीम व कमी जोखीम असे स्त्रोतांचे वर्गीकरण करुन स्वच्छता सर्वेक्षणात आढळून आलेल्या कारणानुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आदी विशेष उपाम राबवण्यात यावेत, अशा सूचना उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा पाणी व स्वच्छता मोहिमेचे निर्देश अधिकारी व कर्मचारी, विस्तार अधिकारी यांना दिले आहेत.

08 TO 14 APRIL 2024 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 4/6/2024 8:08 PM Page 1



# मुद्देमालासह घरफोडी करणारे नाशिक ग्रामीण एलसीबीने केले जेरबंद

**नाशिक/प्रतिनिधी**



वावी पोलीस स्टेशन हद्दीत दिवसा घरफोडी करणाऱ्या सहा गुन्हेगारांना नाशिक ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २५ लाख रुपयांच्या मुद्देमालासह अटक केली आहे. यामध्ये एका महिलेचा देखील समावेश आहे. विशेष बाब म्हणजे वावी पोलिस स्टेशनला घरफोडीची फिर्याद दाखल करणाऱ्या तरुणास अटक करण्यात आलेली महिला आरोपी ओळखते. याच ओळखीचा फायदा घेत ती फिर्यादी तरुणास शॉपिंग करण्यास घेऊन गेली होती. याच कालावधीत तिच्या साथीदारांनी त्याच्याकडे घरफोडी केल्याचे उघडकीस आले आहे. मयुरेश निवृत्ती काळे (रा.पाथरे बु।।, ता. सिन्नर, जि. नाशिक) तरुणाच्या राहत्या घरी दुपारच्या वेळी बंद घराचा कडी कोयंडा तोडून अज्ञात इसमांनी घरफोडी केली होती. या घरफोडीत लाखो रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला होता. या घटनेप्रकरणी वावी पोलीस स्टेशनला गुरनं १४२/२४ भादवि कलम ४५४, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा समांतर तपास नाशिक ग्रामीण एलसीबी पोलीस निरीक्षक राजू सुर्वे व त्यांचे सहकारी करत होते. या गुन्हयाच्या समांतर तपासात स्थानिक गुन्हे शाखेचे अंमलदार पोकॉ विनोद टिळे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या तसेच तांत्रिक तपासात सहा आरोपी निष्पन्न झाले. सुनिल शंकर म्हस्के (रा. साबरवाडी, ता. येवला, जि. नाशिक), चांगदेव भागीनाथ देवडे (रा. बदापुर, ता. येवला, जि. नाशिक), कैलास शिवाजी मावई (रा. चिचोंडी, ता. येवला, जि. नाशिक), अकरम कमरूद्दीन शेख (रा. विंचुर रोड, येवला, ता. येवला, जि. नाशिक), जीवन वाल्मीक कोल्हे (रा. हडप सावरगाव, ता. येवला, जि. नाशिक) आणि अलका दिपक जेजुरकर (रा. येवला, ता. येवला, जि. नाशिक) अशी त्यांची नावे निष्पन्न झाली. या सहा जणांकडून त्यांनी गुन्हयात चोरुन नेलेल्या रोख रक्कमेतील १४ लाख ७ हजार रुपये, गुन्हयात चोरीस गेलेले सर्व दागिने व चोरीच्या रकमेतून खरेदी केलेला ७ हजार रुपये किंमतीचा मोबाईल फोन तसेच गुन्हा करण्यासाठी वापरलेली मारुती इर्टिगा कार (एचएच ०४ ईटी ७८९५) व इर्टीगा कार एमएच १४. क्युएक्स ४३९९ अशा दोन चारचाकी असा एकुण २५ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या घटनेतील फिर्यादी तरुण मयुरेश काळे व आरोपी महिला एकमेकांना ओळखतात. मयुरेश याच्या घरात रक्कम आणि दागिने असल्याची अलका जेजुरकर या आरोपी महिलेस माहिती होते. घटनेच्या दिवशी दोघे शिर्डी येथे खरेदीसाठी गेले. दोघे शिर्डीला सोबत नेल्यानंतर तिच्या इतर साथीदारांनी मयुरेश याच्या घराची टेहाळणी करत दरवाजाचा कडी कोयंडा उचकटून, घरात प्रवेश केला. घराच्या कपाटात ठेवलेली रोख रक्कम व देवीच्या अंगावरील दागिने असा लाखोंचा मुद्देमाल त्यांनी चोरी केला. पुढील तपासकामी अटकेतील सर्वांना वावी पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे. नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर व उपविभागीय पोलीस अधिकारी (निफाड विभाग) निलेश पालवे यांच्या मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राजु सुर्वे, सपोनि गणेश शिंदे, पोउनि दत्ता कांभीरे, पोउनि नाना शिरोळे, पोलीस अंमलदार नवनाथ सानप, विश्वनाथ काकड, विनोद टिळे, मेघराज जाधव, उदय पाठक, संदिप नागपुरे, हेमंत गरूड, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम, गिरीष बागुल, चालक विकी म्हसदे, महिला पोलीस अंमलदार योगिता काकड, छाया गायकवाड, अस्मिता मढवई यांच्या पथकाने हा गुन्हा उघडकीस आला आहे.

## पालघर जिल्ह्यात मुद्रांक पेपरचा तुटवडा

**वाडा/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील वाडा, विक्रमगड, जव्हार, मोखाडा, डहाणु, तलासरी, पालघर, वसई या सर्व तालुक्यातील मुद्रांक (स्टॅम्प) पेपर विक्रेत्याचे परवाने पुढील मुदतीसाठी नुतीकरणासाठी गेल्याने १ एप्रिल २०२४ पासुन पालघर जिल्ह्यात मुद्रांकाची विक्री पूर्णतः बंद होवुन सर्व व्यवहार ठप्प झाले आहेत. नविन आर्थिक वर्षाच्या सुरवातीलाच नागरीकांना प्रतिज्ञापत्र, बँक कर्ज, शेतकऱ्यांना पिक कर्ज, विद्यार्थिना जात पडताळणी व शैक्षणिक प्रवेशाकामी लागणारे मुद्रांक (स्टॅम्प) पेपर विकी बंद असल्याने नागरीक, शेतकरी व विद्यार्थ्याचे अतोनात हाल होत आहेत. नाशिक, धुळे, नगर हया सारख्या ठिकाणी परावाने १ एप्रिल २०२४ रोजीच नुतनीकरण झाले आहेत किंवा परवाने नुतनिकरण होईस्तोवर मुद्रंकाची विकी चालु ठेवणेची परवानगी देण्यांत आल्याने नागरीक, शेतकरी व विद्यार्थी यांची योग्य सोय झालेली आहे. परंतु पालघर जिल्हयात अजुनही परवाने नुतनीकरणे झोलेले नाहीत. शासनाने नागरीकांची गैरसोय विचारात घेवुन परवाने नुतनिकरण होईस्तोवर मुद्रंकाची विक्री चालु ठेवणेची परवानगी देण्यांत आलेली नाही व कोणतीही उपाय योजना मुद्रांक विभागाने केलेली नाही. मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय पालघर हे निवडणुकांच्या कामाचे कारण पुढे करुन नागरीकांना वेठीस धरत आहे.

## चोरी करणाऱ्या चोरट्यांच्या चौकडीला २४ तासात अटक

**भिवंडी/प्रतिनिधी**



भिवंडी ठाणे बायपास रस्त्यावर सकाळच्या सुमारास ट्रक चालकावर हल्ला चढवत त्याला लुटणाऱ्या चार जणांच्या चौकडीस कोनगाव पोलिसांनी अवघ्या २४ तासात शिताफीने अटक करीत जेरबंद करण्यात यश मिळवले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मुंबई नाशिक महामार्गावरील भिवंडी ठाणे बायपास रस्त्यावर २६ मार्च रोजी सकाळी सहा वाजताच्या सुमारास टायर चेक करण्यासाठी ट्रक चालक खाली उतरला असता चार चोरट्यांनी या संधीचा फायदा घेत ट्रक चालकाला लोखंडी सळई ने मारहाण करून त्याच्याकडील ४६६० रुपये रोख रक्कम व आधार कार्ड, स्मार्ट कार्ड, अशा वस्तू जबरी चोरी करून पसार झाले होते. याबाबत ट्रक चालक यांनी कोनगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरां विरोधात गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन कोनगाव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक निशीकांत विश्वकार यांच्या मार्गदर्शना खाली सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव चुंबळे व तपास पथकातील पोलिस कर्मचारी मधुकर घोडसरे, नरें पाटील, रमाकांत साळुंखे, राहुल वाकसे, हेमंत खडसरे, हेमराज पाटील, अच्युत गायकवाड, कुशल जाधव यांनी गुप्त बातमीदाराच्या मदतीने आरोपी शिवा नायक, निखिल कोरसे, संतोष राठोड व रवी गौड या चार सराईत चोरट्यांना २४ तासात ताब्यात घेऊन त्यांच्याकडून गुन्ह्याची उकल करून जबरी चोरीतील सर्व मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांनी यश मिळविले आहे.सदर गुन्हयाचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव चुंबळे हे करीत आहेत.

## महाराष्ट्रासह तेलंगणामध्ये घरफोड्या करणारे दोन अट्टल चोरटे अटकेत



**कल्याण/प्रतिनिधी**

महाराष्ट्रासह तेलंगणा राज्यामध्ये घरफोड्या करणारे दोन सराईत चोरटे महात्मा फुले पोलीस ठाण्याच्या पथकाने अटक केले आहेत. या आरोपींकडून एकूण १२ गुन्ह्यांमधील साडे तीन लाखाहून अधिकचा ऐवज पोलिसांनी हस्तगत केला आहे. महाराष्ट्रासह परराज्यात या दोघांवर गुन्हे दाखल आहेत. अविनाश धनाजी शिंदे (२५, रा. बी केबिन रस्ता, दत्त कुटीर चाळ, अंबरनाथ), सॅमसंग रुबीन डॅनियल (२५, रा. क्वालिटी कंपनीजवळ, बेतुरकरपाडा, कल्याण) अशी आरोपींची नावे आहेत. चोऱ्या करून हे चोरटे त्या भागातून काही दिवस गायब होत होते. गेल्या महिन्यापूर्वी कल्याण मधील रेल्वे स्थानकाजवळील सांगळेवाडीत एका नागरिकाच्या घरी चोरी झाली होती. महात्मा फुले पोलीस ठाण्यात या चोरीप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. परिसरातील सीसीटीव्ही चित्रण तपासून उपायुक्त सचीन गुंजाळ, साहाय्यक आयुक्त कल्याणजी घेटे, महात्मा फुले पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश साळवी यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथकाने घरफोड्यांचा शोध सुरू केला होता. घरफोडे हे अंबरनाथ, कल्याणमधील रहिवासी असल्याचे पोलीस तपासात उघड झाले होते. वरिष्ठ निरीक्षक साळवी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक किरण भिसे, जमादार विजय भालेराव आणि इतर सहा जणांच्या पथकाने गुप्त माहितीदारांमार्फ माहिती काढली. त्यावेळी आरोपी अविनाश शिंदे अंबरनाथ परिसरात लपून बसला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी अविनाशचा ठावठिकाणा शोधून त्याला अंबरनाथमधून अटक केली. त्याच्या अटकेने सॅमसंगची माहिती मिळाली. पोलिसांनी सॅमसंगला कल्याण मधून अटक केली. या दोघांच्या अटकेने राज्यासह तेलंगणा राज्यातील अनेक गुन्हे उघड होण्याची शक्यता वरिष्ठ पोलीस निरीक्षक साळवी यांनी व्यक्त केली. जळगाव जिल्ह्यात या दोघांनी चोऱ्या केल्या आहेत. सॅमसंगवर विविध पोलीस ठाण्यात एकूण नऊ गुन्हे दाखल आहेत. अविनाश चोरलेला माल सॅमसंगकडे देत असे. तो माल सॅमसंग किरकोळ किमतीत दुकानदारांना विकत असे.

## जिजाऊ संस्थेचे दिव्यांगांना साहित्य वाटप



**वाडा/प्रतिनिधी**

जिजाऊ शैक्षणिक व समाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष निलेश सांबरे व रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने तब्बल ४५ दिव्यांगांना कृत्रिम पाय (कॅलिबर), कृत्रिम हाथ व कुबड्यांचे वाटप करण्यात आले. २१ फेब्रुवारी रोजी वाडा तालुक्यातील पाली येथे जिजाऊ शैक्षणिक व समाजिक संस्थेच्या वतीने दिव्यांगांसाठी आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन केले होते या शिबिरातील सहभागी झालेल्या दिव्यांगांच्या हाताचे व पायचे मापे घेण्यात आली होती त्यांना शनिवारी(दि.६ एप्रिल ) जिजाऊ शैक्षणिक व समाजिक संस्थेच्या वाडा शहरतील संपर्क कार्यालयात एकूण ४५ जणांना कृत्रिम पाय (कॅलिबर), कृत्रिम हाथ व कुबड्यांचे वाटप केले. शशिकांत पाटील पालघर लोकसभा क्षेत्र उपाध्यक्ष, परेश पाटील तालुका अध्यक्ष वाडा, संगीत मेने उपाध्यक्ष वाडा, कैलास पाटील तालुका प्रमुख जिजाऊ संस्था, सुधीर विशे, संचिता पाटील, मनस्वी पाटील आदी उपस्थित होते.



## उन्हाळ्यात भिवंडी बस स्थानकातील पाणपोई धूळ खात, प्रवासी मात्र बेजार

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरातील बस स्थानकातील आवारात बांधण्यात आलेल्या पाणपोईची दुरावस्था झाली असून कित्येक वर्षा पासून धूळ खात पडून बंद पडली असून काही नळाच्या तोटी ही तुटलेल्या अवस्थेत आहे. त्यातच आता उन्हाळ्याच्या झळा वाढल्या असताना भिवंडी बस स्थानकात पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्याने नागरीक व प्रवाशांचे मोठ्या प्रमाणा वर हाल सुरू झाले आहेत. त्यामुळे नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. भिवंडी बस स्थानकात शहरा बाहेरून मोठ्या प्रमाणावर बस येत असून त्यातून शेकडो प्रवासी भिवंडी शहरात येत असतात. तर ग्रामीण भागात सुध्दा जाणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक आहे. परंतु बस स्थानकात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्याने अनेकांचा हिरमोड होत आहे. त्यासाठी विकत पाण्याची बाटली घेऊन आपली तहान भागवावी लागत आहे. बस आगारातील अधिकाऱ्यांनी व प्रशासनानी याकडे लक्ष द्यावा अशी मागणी नागरिक करत आहे. पाणपोई दुरूस्ती बाबतचा प्रस्ताव ठाणे विभागीय कार्यालयाकडे पाठविण्यात आला असून तात्काळ पाणपोई सुरू करण्या बाबत कार्यवाही करण्यात येईल अशी माहिती बस स्थानक व्यवस्थापक इम्रान पटेल यांनी दिली आहे.

## अनुभूती निवासी स्कूलमधील विद्यार्थ्यांचे 'आर्ट मेला' प्रदर्शन

**जळगाव/प्रतिनिधी**



अनुभूती निवासी स्कूलच्या विद्यार्थ्यांचे वर्षभरात कलेतील विविध प्रकारांचे प्रशिक्षण घेतले जाते. यातून स्कूलच्या विद्यार्थ्यांचे 'आर्ट मेला' हे प्रदर्शन त्यांच्यातील सुप्त कलागुणांचे दर्शन घडवते. पॉटरी (मातीकाम), आर्ट मेला मधील चित्र, शिल्प, पेटिंग हे एखाद्या व्यावसायिक कलावंताच्या तोडीचे आहेत. सदर प्रदर्शनात विशेषत्वाने उल्लेख करावा अशी एक रचना करण्यात आली ज्यामध्ये इयत्ता ९ चे विद्यार्थी रोहन पोतदार, चिन्मय पाटीदार आणि दिव्यांश बेद यांनी पॉटरी माध्यमातून साकारलेली नो ट्री- नो बर्डस्' (जिथे आधार संपतो, तिथे श्वासही थांबतो) ही इंस्टॉलेशन रचना विशेष उल्लेखनीय आहे. माती कामातून तयार केलेल्या पक्ष्यांना एका मृत झाडाच्या खोडाजवळ त्यात मृतावस्थेत दाखवण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या संकल्पनेनुसार आजकालच्या धकाधकीच्या जीवनात तथाकथित विकास वाटेवरून चालत असताना माणसाने सिमेंटची जंगले तयार करत निसर्गाची आतोनात हानी केली आहे. सदर मांडणी शिल्पामध्ये मृत झालेल्या झाडाजवळ पडलेले मृत पक्षी म्हणजे दुसरे-तिसरे कुणी नसून आपण सर्व म्हणजेच मानवजात असा व्यापक संदेश देणारी ही कलाकृती संपूर्ण प्रदर्शनामध्ये लक्ष वेधून घेत आहे. विद्यार्थ्यांच्या निरागस भावविश्वातून प्रकट झालेली ही रचना प्रबोधनात्मक संदेश देत विचार करायला भाग पाडणारी आहे. कॅनवास तसेच कागदावरील चित्रकला, पेस्टल रंग, स्टेन ग्लास, चारकोल-पेन्सिल अशा विविध माध्यमातून निसर्ग, शाळा, व्यक्तिचित्र, मांडणीचित्र, परिसर, संस्कृती, कल्पनाविलास यासह पर्यावरण हे सर्व काही या प्रदर्शनात सर्वांगसुंदर, सुबक पद्धतीने शाळेच्या निर्सगरम्य परिसरात मांडण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना देण्यासाठी प्रोत्साहन महत्त्वाचे असते ते अनुभूती निवासी स्कूलच्या कला विभागातील शिक्षकांकडून, व्यवस्थापनाकडून सातत्याने मिळत असते त्यातून अशा कलाकृतींची निर्मिती वर्षभर होत असते. विविध कलांचा अभ्यास करून निर्माण केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन असलेला 'आर्ट मेला' चे आर्ट ॲण्ड क्राफ्ट विभाग परिसरात दि. १ एप्रिल रोजी उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी अनुभूती स्कूलचे संचालक अतुल जैन, संचालिका सौ. निशा अनिल जैन, डॉ. भावना अतुल जैन, प्राचार्य देबासिस दास, कला शिक्षक प्रीतम दास, प्रितोम खारा, अनुभुती स्कूलचे शिक्षक तसेच पालक वृंद व रसिक विद्यार्थ्यांनी केलेल्या त्यांच्या 'भाव चित्र विश्वात' जावून त्यांच्या विविध कलांचा 'आनंद शोध' घेत होते. अनुभूती निवासी शाळेतील इ.५ ते १२वीच्या विद्यार्थ्यांच्या निवडक कलाकृती या प्रदर्शनात आहेत.

## थोडक्यात वृत्तांत

### नालासोपारा नाल्यात महिलेचा मृतदेह

वसई : नालासोपारा वसंत नगरी येथील विद्यामंदिर इंग्लिश हायस्कूलजवळील नाल्यात एका वृध्द महिलेचा मृतदेह आढळून आला आहे. मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. याबाबत आचोळे पोलिसांना स्थानिक नागरीकांनी माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळ गाठून अग्निशमन दलाच्या मदतीने महिलेचा मृतदेह नाल्यातून बाहेर काढला. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. या महिलेच्या मृत्यूचे कारण अद्याप समजू शकले नाही. या प्रकरण अधिक तपास सुरु आहे असे पोलिसांनी सांगितले.

### आचारसंहिता भंग; गुन्हा दाखल

मिरा-भाईंदर : शिवजयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात शिवसेनेच्या (शिंदे गट) लोकप्रतिनिधीचा बॅनर लावून आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी काशिगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हा शहरातील पहिलाच गुन्हा आहे. काशिमीरा येथील आनंद दिघे चौकात शिवसेना (शिंदे गट) पक्षातर्फे २९ मार्च रोजी शिवजयंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी व्यासपीठावर शिवसेना आमदार प्रताप सरनाईक यांचे जाहिरात फलक लावण्यात आले होते. ही बाब निवडणूक आचारसंहिता भरारी पथकाचे अधिकारी शशिकांत पवार यांच्या निदर्शनास आली होती. याबाबत त्यांनी आयोजकांना विचारणा केली असताना त्यांना उडवाउडवीची उत्तरे मिळाली.त्यामुळे आचारसंहिता नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी काशिगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आहे.

### अपघातात बोर्डी येथील तरुणाचा मृत्यू

बोर्डी : बोर्डी येथील शमीम मुंशी या तरुणाचा बुधवारी (ता. ३) गुजरात राज्यातील पलसाना येथील अपघातात मृत्यू झाला. ते टुरिस्टचा व्यवसाय करत असत. बोर्डी येथील काही पर्यटकांना घेऊन गुजरातमधील स्टॅच्यू ऑफ युनिटी येथे ते गेले होते. रात्रीच्या वेळी परतत असताना पळसाना येथे टायर पंक्चर झाल्यामुळे गाडी थांबून तो बदलत असताना अचानक भरधाव वेगाने आलेल्या ट्रकने त्यांना जोरदार टक्कर दिली. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्याच्या पश्चात आई-वडील, पत्नी, दोन मुली, एक मुलगा असा परिवार आहे.

### चोरीप्रकरणी महिलेस अटक

अंधेरी : धार्मिक कार्यक्रमांत चोरी करणाऱ्या हर्षा अनिल वासवानी या महिलेस बांगुरनगर पोलिसांनी अटक केली. तिला बोरिवलीतील स्थानिक न्यायालयात हजर करण्यात आले होते. तक्रारदार महिला मालाड येथे राहते. गेल्या आठवड्यात ती मालाड येथील एका धार्मिक कार्यक्रमात गेली होती. तिथल्या गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात व्यक्तीने तिची पर्स चोरी केली. घरी आल्यानंतर तिला हा प्रकार लक्षात आला. त्यामुळे तिने बांगुरनगर पोलिसांत तक्रार केली होती. चोरीचा गुन्हा नोंदवून पोलिसांनी धार्मिक कार्यक्रमातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली होती. या फुटेजमध्ये हर्षा ही तक्रारदार महिलेची पर्स चोरी करताना दिसून आली. या फुटेजवरून तिची माहिती काढून तिला मालाड येथून पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले होते. तिनेच ही चोरी केल्याची कबुली दिली. ती सध्या पोलिस कोठडीत असून तिची चौकशी सुरू आहे.

### देवणीत हॉटेलमध्ये अशुद्ध पाणी!

देवणी : शहरातील अनेक हॉटेलमध्ये अशुद्ध पाणी वापरत असल्यामुळे सर्वसामान्य लोकांचे जीवन धोक्यात आले आहे अन्न भेसळ कार्यालयाचे देवणी शहराकडेअर्थपूर्ण दुर्लक्ष होत असून तहसील कार्यालयाने देवणी शहरातील सर्व हॉटेलमधील पाणी नमुने घेऊन प्रयोगशाळा येथे तपासून भेसळयुक्त अशुद्ध पाणी वापरणाऱ्या हॉटेल चालकावर कार्यवाई करण्याची मागणी होत आहे. सद्या देवणी शहराला होणारा पाणी पुरवठा गाळ मिश्रित होत आहे पिण्या ऐवजी नसला तरी शहरातील ८०% लोक वॉटर फिल्टरचे पाणी पीत आहेत मात्र सर्वसामान्य माणूस घराच्या बाहेर पडला की त्यांना हॉटेल मधील दोन दोन आठवडे साठवन केलेले घाण असुद्ध पाणी पिण्यास भाग पडत आहे तहसीलदार यांनी देवणी शहरातील हॉटेल मधील पाणी तपासून तात्काळ कार्यवाई करण्याची मागणी जनतेतून होत आहे.

### कचरा उचलण्याबाबत बेफिकिरी

विरार : आगाशी गावात पालिकेचे सफाई कर्मचारी ठिकठिकाणचा कचरा उचलण्यात हयगय करीत असल्याने नागरीकांना कचऱ्याचा त्रास होऊ लागला आहे. या बाबत पालिका प्रशासन जातीने लक्ष देत नसल्याने ग्रामस्थांच्या वेळोवेळी केलेल्या तक्रारींची दखल घेतली जात नाही. प्रत्येक घराच्या डझबीनमध्ये कचरा ठेवला जातो. त्यात ओला कचरा, सुका कचरा व भंगार देखील असते. कर्मचारी कचऱ्यासोबत मिळणाऱ्या भंगारासाठी स्वतंत्र पिशवी जवळ ठेवतात व भंगार कचरा वेगळा गोळा करुन तो भंगारवाल्यांना विकतात. मात्र ग्रामपंचायत परिसरात कचरा संकलन व्यवस्थित होते की नाही, स्वच्छता राखली जाते का? याबाबत कोणीही दखल घेत नाही. पालिकेचे दोन-चार कर्मचारी पूर्वीच्या ग्रामपंचायत कार्यालयात असतात ते दाद फिर्याद घेत नाहीत. आगाशी ग्रामपंचायत नाही म्हणताना एक लाख लोकसंख्येची झाली आहे. येथे स्वच्छतेच्या प्रश्नावर पालिका प्रशासनाने बारकाईने लक्ष देणे आवश्यक आहे. सफाई ठेकेदाराला योग्य त्या सूचना करणे आवश्यक आहेत. नागरीकांना कचऱ्याविषयी तक्रारी असू नयेत, उन्हाळा असल्याने ताप येणे व इतर किरकोळ आजार गावात सुरु आहेत. त्यामुळे स्वच्छतेवर अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

### पाणी टंचाई बाबत हेल्पलाईन क्रमांक

पालघर : पालघर जिल्हयातील नागरिकांना सुचित करण्यात येते की, पाणी टंचाई कालावधीत नागरिकांकडून पाणी टंचाईच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालया मध्ये नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. सदर नियंत्रण कक्षातील दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२९७४७४ हा असुन भ्रमणध्वनी क्रमांक ८२३७९७८८७३ हा आहे. तरी पाणी टंचाई बाबत अडचण निर्माण झाल्यास वरील हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा.

08 TO 14 APRIL 2024 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 4/6/2024 8:08 PM Page 1



### लातूर महापालिका प्रशासनाच्या मनमानी कारभारामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात!

# कचरा पेटण्याचे प्रकार थांबवावेत ग्रीन लातूर वृक्ष टीमची मागणी

**लातूर/प्रतिनिधी**

मनपा कचरा व्यवस्थपना अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दिरंगाईमुळे शहरात कचऱ्याच्या ढिग साचत असून कचरा पेटविण्याच्या प्रकारात वाढ होतान दिसत आहे. त्यामुळे परिसरामध्ये प्रचंड दुर्गंधी आणि धुराचे लोट पसरलेल जात आहेत. यामुळे नागरिकांचे जीव धोक्यात येऊन कर्करोग, दमा, एलर्जी, त्वचा विकार, नाकातून पाणी वाहने, दम लागणे अशा अडचणींना गर्भवती स्त्रिया, लहान मुले, वृद्ध व्यक्ती यांना सामोरे जावे लागत आसल्याचा आरोप ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. दरम्यान मनपा प्रशासनाला सविस्तर माहीती देवूनही मनपा कर्मचारी टाळाटाळ करीत आसल्याचे सांगून कचरा पेटण्याचे प्रकार थांबवावेत अशीही मागणी केली आहे. शहरातील नंदी स्टॉप औसारोड लगत असलेल्या कचरा डेपोला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने आग लावली, पाहता पाहता अवघ्या दहा ते पंधरा मिनिटांमध्ये सगळा कचरा, प्लास्टिक जळून खाक झाले. यामध्ये अंदाजे सात ते आठ ट्रॅक्टर पेक्षा अधिक कचरा जळाला. ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या सदस्यांनी त्याठिकाणी वेळेवर पोहोचून बकेट च्या साह्याने पाणी टाकून आग विझवण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. दरम्यान अग्निशामक दलाला बोलावून त्यांच्या द्वारे सगळी आग विझवून घेतली. तोपर्यंत



सगळ्या परिसरामध्ये प्रचंड दुर्गंधी आणि धुराचे लोट पसरलेले होते. वस्तूतः ही जागा खाजगी मालकाची असून याठिकाणी महानगरपालिकेने कचरा डेपो तयार केलेला आहे. सोबतच या ठिकाणी औसा रोड वरती असलेल्या सगळे खाद्य पदार्थ हातगाडीवाले, फळांचे ज्यूस वाले संध्याकाळी त्यांचे जवळ असलेला शिल्लक कचरा आणून या ठिकाणी टाकतात यामुळे परिसरातील नागरिक सुद्धा त्रस्त झालेले आहेत या नागरिकांनी महानगरपालिकेकडे वारंवार तक्रार दिलेली आहे. मागील पाच-सहा वर्षांपासून सातत्याने तक्रारीत देत आहेत पण हा कचरा डेपो बंद करण्याचा सौजन्य कोणीही घेतलेला नाही. संबंधीत सर्व खाद्यपदार्थ विक्रेते, फळ विक्रेते, ज्यूस विक्रेते यांनी स्वतःजवळ कचरा पेटी ठेवूनच त्यात कचरा साठवून घंटा गाडी आल्यावर त्याना तो कचरा देणं अपेक्षित असताना अस होताना दिसत नाही. आणि संबंधित मनपा अधिकारी देखील असा प्रयत्न करत नाहीत. ओला कचरा सुका कचरा ही संकल्पना लातूर मनपाद्वारे बात करण्यात आलेली आहे असं दिसून येत आहे. प्रत्येक दुकानासमोर घरासमोर कचरा कोंडा ठेवून त्यात एखाद्या दोन दिवसासाठी जर कच्चा साठवण्यात आला तर रस्त्यावरती इतर कचरा पडणार नाही कचरा डेपो कमी होते आणि घंटागाडीचेच कर्मचारी तो कचरा उचलून घेऊन जातील अशी व्यवस्था करणे आवश्यक आहे. मागील दोन महिन्यापूर्वीच या कचरा डेपो वरती प्रचंड आग लागली होती त्यावेळेस सुद्धा अग्निशमन दलाने येऊन कचरा विझवला होता, शहरात मागील महिन्यात ठीक ठिकाणी जमा झालेला कचरा पेटवून देण्यात येत आहे. समाज माध्यमातून, विविध वर्तमानपत्रातून दररोज बातम्या प्रकाशित होत आहेत पण यावरती कुठलीही ठोस अशी कारवाई करण्यात आलेली नाही. एखाद्या भागात कचऱ्यात पेटला असेल तर झोन नुसार संबंधित अधिकाऱ्याची मोबाईल नंबर जाहीर करण्यात आलेले आहेत पण खूप वेळा हे अधिकारी फोन केल्यानंतर तास एक तास त्या ठिकाणी येत नाहीत किंवा हा भाग माझ्याकडे नाही तो भाग माझ्याकडे आहे असे बोलून चाल ढकल करतात. कचऱ्याला आग लावण्याच्या अशा विविध घटनेमध्ये आजपर्यंत महानगरपालिकेच्या आयुक्त उपायुक्त यांनी संबंधित ठिकाणी जाऊन कधीही पाहणी केली नाही किंवा शहानिशा केली नाही, किंवा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला नाही. जी लोक आयुक्त, उपायुक्त यांना सातत्याने फोन करतात त्यांची फोन नंबर ब्लॉक करण्यात आलेले आहेत किंवा त्यांची फोन आयुक्त किंवा उपायुक्त घेत नाहीत. व्हॉट्सअप वर रिप्लाय दिला जात नाही. दिवसे दिवस कचरा पेटवण्याचे प्रकरण खूप मोठ्या प्रमाणात वाढत आहे यामुळे नागरिकांचे जीव धोक्यात येऊन कर्करोग, दमा, एलर्जी, त्वचा विकार, नाकातून पाणी वाहने, दम लागणे अशा अडचणींना गर्भवती स्त्रिया, लहान मुले, वृद्ध व्यक्ती यांना सामोरे जावे लागत आहे.

## रक्तकर्णचे शंभरावे रक्तदान

## प्रा.किरण थोरात यांचा विक्रम!



**वाडा/प्रतिनिधी**

रक्तदानातून दुसऱ्यांना जीवदान मिळते ही जाणीव फार कमी लोकांना असते. आपल्याकडे रक्तदानाबाबत गैरसमज अधिक आहेत. अशा परिस्थितीत रक्तदाता ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष प्रा. किरण थोरात यांनी रक्तदान चळवळ सुरू केली असून त्यांनी स्वतःच शंभर वेळा रक्तदान करून शतकवीर रक्तदाता होण्याचा सन्मान मिळवला आहे. वाडा येथील ग्रामीण रुग्णालयात नुकताच प्रा. थोरात यांचा शतकपूर्ती रक्तदान सोहळा झाला. त्यांच्या पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त त्यांनी शंभराव्या वेळी रक्तदान केले, तर यावेळी आयोजित शिबिरात ८७ जणांनी रक्तदान करून प्रा. थोरात यांना आगळ्यावेगळ्या शुभेच्छा दिल्या. या ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार म्हणून रोटरी क्लब क्लब ऑफ वाडाच्या वतीने विशेष सन्मानपत्र देऊन प्रा.थोरात यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या रक्तदानाचा सोहळा यशस्वी होण्यासाठी आई एकविरा गोविंदा पथक, गावदेवी गोविंदा पथक, वाडा येथील इंडियाना फाउंडेशन, संवाद संस्था आणि रक्तकर्णा रक्तदाता ग्रुप यांनी विशेष परिश्रम घेतले.

## वसई न्यायालयात ऐतिहासिक नाण्यांना उजाळा

**वसई/प्रतिनिधी**

अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी फार पूर्वीपासून नाणी चलनात आहेत. प्राचीन साम्राज्य, राजवटींसह स्वातंत्र्यपूर्व काळातील नाणी वसईकरांना पाहता यावी, यासाठी वसई न्यायालयाच्या आवारात असलेल्या बार असोसिएशन रूम येथे नाणी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्राचीन नाणी व त्याचा इतिहास समजण्यासाठी न्यायाधीश, वकिलांसह मोठ्या संख्येने नागरिकांनी भेट दिली. शिवजयंतीचे औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. बार असोसिएशनचे ॲड. भरत पाटील, ॲड. आनंद घरत, ॲड. पूनम जाधव यांनी नाणी संग्रह प्रदर्शनाचे आयोजन केले होते. मुंबई कॉईन्स सोसायटी न्यूमिसमॅटिक सभासद जोसेफ लोपीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती




राजाराम महाराज, छत्रपती शाहू महाराज, व्यंकोजी राजे भोसले, पेशवेकालीन व पोर्तुगीज, तसेच बसिन (वसई) अशी दुर्मिळ नाणी जमा केली आहेत. जोसेफ लोपीस यांच्या मदतीने नाणी प्रदर्शन भरविण्यात आले. सुमारे एक हजार नाणी प्रदर्शनात होती. तोफगोळेदेखील नागरिकांना पाहण्याची संधी मिळाली. या वेळी न्यायाधीश आर. डी. देशपांडे, न्यायाधीश खोंगल, नाथानी, वाळके आदींनी भेट दिली, तर ज्येष्ठ वकील अविनाश विद्वांस, नंदन भगत बार असोसिएशनचे अध्यक्ष परमानंद ओझा, दिगंबर देसाई, साधना धुरी यांच्यासह मोठ्या संख्येने वकील मंडळी सहभागी झाली होती. जग तंत्रज्ञानात पुढे जात आहे. नव-नवी संशोधने होत आहेत, अशावेळी प्राचीन इतिहासालादेखील तितकेच महत्त्व आहे. नाणी प्रदर्शन म्हणजे जगात पूर्वी घडलेल्या घडामोडी आणि तेव्हाच्या राजे-महाराजे, नागरिकांनी वेळोवेळी केलेले बदल दिसून येतात, असे मत ॲड. नंदन भगत यांनी व्यक्त केले. सध्या शहराचे नाव वसई असले तरी प्राचीन काळी बसिन म्हणून प्रचलित होते. त्यावेळी बसिनचे नाणेदेखील चलनात होते. नाणी प्रदर्शनात बसिन एक पैसा हे नाणेदेखील समाविष्ट असल्याने वसईकरांनी ...पान ६ वर

## लातूर येथील डॉ.घुगे यांचे वैद्यकीय शिक्षणाचे प्रमाणपत्र व हॉस्पिटलचा परवाना रद्द करण्याची मातंग समाजाची मागणी

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर येथील आयकॉन सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. प्रमोद घुगे यांनी हॉस्पिटलच्या लिफ्टच्या कामाच्या संबंधाने मातंग समाजातील कामगार आनंद प्रल्हाद कोटंबे यांना अमानुषपणे मारहाण करून जीवे मारण्याची जमकी दिली. डॉ.प्रमोद घुगे यांनी पैशाच्या



जोरावर लातूर शहरात दहशत निर्माण केले असून दलित समाजाच्या कामगाराला जातीय द्वेषातून माणुसकीला काळीमा फासणारे गुन्हेगारी कृती केले आहे. त्यांच्या आयकॉन हॉस्पिटलमध्ये लिफ्ट बसविण्याचे कंत्राट अनंत कोटुंबे यांना दिले होते त्या संबंधित कायदेशीर करारही केले होते. हे काम महागात पडत आहे या गैरसमजुने त्यांनी लिफ्ट बसविण्याचे चालू असलेले काम बंद केले आणि कामगार आनंद कोटंबे यांच्याकडे ५० लाख रुपयाची मागणी केली अन कुटुंबे यांना ते शक्य नसल्याने डॉ.प्रमोद घुगे यांनी आनंद कोटंबे यांचे अपहरण करून त्यांच्या फार्म हाऊस मधील म्हशीच्या गोठ्यात दोन दिवस दाबून ठेवले व भाडोत्री गुंडाकडून त्यांना सतत दोन दिवस अमानुष मारहाण केले.एवढेच नव्हे तर त्यांच्या गुप्तांगामध्ये मिरचीची पूड टाकून त्यांच्यावर अनैसर्गिक अत्याचारही केला व मरणासन्न अवस्थेत रेल्वे स्टेशन रोडला टाकून दिले. कोटुंबे शुद्धीवर आल्यानंतर त्यांनी तात्काळ पोलिसांकडे धाव घेतली. लातूर जिल्ह्यातील पोलिस, जिल्हा प्रशासन आरोपी डॉ. घुगे यांचे सगेसोयरे असल्याने त्यांना पोलीस ...पान ६ वर

## पालघर जिल्ह्यातील नागरीकांनी मतदानाचा हक्क बजवावा - जिल्हाधिकारी गोविंद बोडके



**पालघर/प्रतिनिधी**

लोकसभेच्या निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर झाला असून येत्या २० मे रोजी मतदान होणार आहे. पालघर लोकसभा मतदार संघातील सर्व नागरीकांनी आपला मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी केल. स. तु. कदम विद्यालय येथे SVEEP ctivity अंतर्गत मतदान जनजागृती, लोकशाहीतील सहभाग, मतदानाची टक्केवारी वाढावी या उद्देशाने विद्यार्थ्यांनी देशाचा नकाशा मानवी रांगोळी (१५० फूट बाय १३० फूट) तयार करण्यात आला होता. जवळपास ७०० विद्यार्थ्यांच्या सहभागाने हा नकाशा तयार करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना मतदानाची शपथ देण्यात आली. त्यावेळी जिल्हाधिकारी गोविंद बोडके बोलत होते. यावेळी उप जिल्हा निवडणूक अधिकारी अपर्णा सोमाणी, उपजिल्हाधिकारी (रोहयो) विजया जाधव, तहसीलदार रमेश शेंडगे, जीवन विकास संस्थेचे कार्याधक्ष वाघेश कदम व बोईसर पालघर ...पान ६ वर

## वाडा तालुका सरपंच परिषदेच्या अध्यक्ष पदी रवींद्र जोगवला यांची बिनविरोध निवड



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील सावरखांड येथे साक्षी संतोष साठे सरपंच अबिटघर तथा जिल्हा समन्वयक सरपंच परिषद, महाराष्ट्र राज्य यांच्या प्रमुख उपस्थितीत व विद्यमान अध्यक्ष भरत हजारे यांच्या अध्यक्षतेखाली वाडा तालुका सरपंच परिषदेची महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत सरपंच महोदयांना आपल्या आपल्या ग्रामपंचायत मध्ये काम करताना येणाऱ्या विविध अडचणी व त्यावरील उपाययोजना या बाबत साधक बाधक चर्चा केली.येणारे मोर्चे तसेच विकासात्मक कामे करताना येणाऱ्या अडचणी यावर सामोपचाराने अथवा प्रसंगी कायदेशीर मार्गाने मार्ग कसे काढता येतील याबाबत सकारात्मक चर्चा केली. याच वेळी इतरांना देखील नेतृत्व करण्याची संधी मिळावी या उदात्त हेतूने मागील तालुका कार्यकारिणीने दिलेल्या राजीनामे सरपंच परिषदेने स्वीकारून नव्याने कार्यकारिणी तयार करण्याचे निश्चित केले व त्यावर तात्काळ अंमलबजावणी करून नवीन कार्यकारिणी तयार करताना रवींद्र जोगवला यांनी तालुक्यातील सरपंच परिषदेचे नेतृत्व करण्याची इच्छा व्यक्त केली असता सर्वानी एकमुखाने पाठींबा दर्शवता वाडा तालुका सरपंच परिषदेच्या अध्यक्ष पदी पिक ग्रामपंचायतचे सरपंच रवींद्र विठ्ठल जोगवला यांची बिनविरोध निवड करण्यात आली. नवनिर्वाचीत अध्यक्ष रवींद्र विठ्ठल जोगवला व त्यांची कार्यकारिणी यांच्याकडे असलेला अनुभव, कामाचा उरक, शासकीय स्तरावर असलेले सलोख्याचे संबंध आणि हाती घेतलेले काम तडीस नेण्याची वृत्तीचा फायदा वाडा तालुका सरपंच परिषदेला नक्की होईल अशी सदिच्छा व्यक्त करून मावळत्या कार्यकारिणीचे पदाधिकारी दिनेश कोदे, मोतीराम नडगे, लहू धींडा, किशोर पवार यांनी स्वागत केले. तर मावळते अध्यक्ष भरत हजारे व जिल्हा समन्वयक साक्षी संतोष साठे व उपस्थित सर्व सरपंच महोदयांनी नवीन कार्यकारणीला शुभेच्छा देऊन चांगले काम करण्यासाठी सदिच्छा व्यक्त केली.

## पाणी टंचाई प्रदेशातील पाण्याचे स्त्रोत शोधणार



**पालघर/प्रतिनिधी**

दुर्गम ग्रामीण भागातील जनतेला उन्हाळा आला की, दरवर्षी पाणी टंचाईला तोंड द्यावे लागते. वर्षानुवर्षे ही समस्या असून उन्हाळ्याच्या दिवसात पाणी पुरवठा किमान पातळीवर सुरु रहावा म्हणून पाणी पुरवठा विभाग खोलवर गेलेल्या जलस्त्रोतांचा शोध घेणार आहे. ग्रामीण भागाला शुद्ध पाणी पुरवठा होण्यासाठी तसेच या पाण्याची गुणवत्ता चांगली राखण्यासाठी ३० एप्रिलपर्यंत स्वच्छता सर्वेक्षणाचे आयोजन पाणी पुरवठा विभागाने केले आहे. या कालावधीत ग्रामपंचायत परिसरातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचा शोध घेतला जाणार आहे. स्वच्छता सर्वेक्षण मोहीमे अंतर्गत ही योजना राबविली जाणार आहे. पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी आपल्या आरोग्य विभागाला दिले आहेत. जिल्ह्यात दरवर्षी स्वच्छता सर्वेक्षण हे आरोग्य विभागामार्फत केले जाते. पावसाळ्यापूर्वी एप्रिल व पावसाळ्यानंतर ...पान ६ वर

## नव विवाहीतांना भेटवस्तू देऊन होळी उत्सव साजरा

**वाडा/प्रतिनिधी**

फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी येणारा होळी हा सण भारतामध्ये विशेषतः उत्तर भारतामध्ये उत्साहाने साजरा होणारा एक सण आहे. याला वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते. होळी हा रंगाचा सण आहे. होळी या उत्सवाला होळी पौर्णिमा, होलिकोत्सव, होलिकादहन, अशी विविध नावे आहेत. होळी हा सण लोक आनंदाने साजरा करतात. ठाणे जिल्हातील वज्रेश्वरी एक खेडे गाव परंतु वज्रेश्वरी देवीचे मंदिर परमपूज्य नित्यानंद स्वामीचे समाधी स्थळ गरम पाण्याचे झरे . अशा वेगवेगळ्या स्वरूपाने नावारूपाला आलेलं पर्यटन क्षेत्र आणि तीर्थक्षेत्र वज्रेश्वरी गावामध्ये देखील अनेक वर्षापासून होळी उत्सव गावकरी साजरा करतात. साजरा करतात. पण ह्या वर्षीचा होळीचा सण वेगळ्या पद्धतीने साजरा करायचा अशी कल्पना पोलीस पाटील अमित राउत यांच्या मनात आली. वज्रेश्वरी गावातील सर्वच सन हे वज्रेश्वरी गावातील तरुणांनी स्थापन केलेल्या वज्रेश्वरी उत्सव



मंडळामार्फत साजरे केले जातात. होळीच्या प्रथेनुसार नवविवाहित दांपत्य होळीला फेरे मारतात. त्याचबरोबर नवविवाहित दांपत्याला भेट वस्तू देऊन. होळीसणाच्या उत्साहात भर पडेल या उद्देशाने वज्रेश्वरी गावचे पोलीस पाटील अमित राऊत यांनी नवविवाहित दांपत्यांना भेटवस्तू आणि पुरणपोळी भेट देऊन अनोख्या पद्धतीने होळीचा सण वज्रेश्वरी गावात साजरा झाला. नव विवाहित जोडप्यांना भेटवस्तु देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. या पुढे दर वर्षी अशाच पद्धतीने नव विवाहित जोडप्यांचा सन्मान केला जाईल वज्रेश्वरी गावचे पोलीस पाटील अमित राऊत यांनी सांगितले.

## मतदारांना मतदानादिवशी सुट्टी

**पालघर/प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकांमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्यरितीने बजावता यावा, यासाठी मतदारांना मतदानाच्या दिवशी सुट्टी देण्याबाबचे शासन परिपत्रक उद्योग ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने निर्गमित केले आहे. कार्यासन अधिकारी खामकांत सोनवणे यांनी प्रसिध्द केलेल्या परिपत्रकात म्हटले आहे, भारत निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक घेतली जाणार आहे. या निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानांचा हक्क योग्यरितीने बजावता यावा यासाठी पुढीलप्रमाणे आदेश देण्यात आले आहेत. निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही, त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी. ही सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना इत्यादींना लागू राहील. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ...पान ६ वर

## नूतन लातूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी पदभार स्विकारला



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर जिल्ह्याच्या नूतन जिल्हा ग्रंथालय अधिकारी म्हणून पुणे येथून आलेल्या श्रीमती वंदना काटकर यांनी मंगळवारी दुपारी प्र.जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के यांच्याकडून आपला पदभार स्विकारला. जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने श्रीमती वंदना काटकर यांचा सत्कार ग्रंथालय संघाचे जेष्ठ संचालक हावगीराव बेरकीळे यांनी शाल, पुष्पगुच्छ देऊन केला. याच कार्यक्रमात गेल्या एक वर्षापासून प्र.ग्रंथालय अधिकारी म्हणून उत्तम कामगिरी केलेले संजय मस्के यांचा सन्मान जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह तथा मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राम मेकले यांनी केला. यावेळी आवर्जून उपस्थित असलेले कोल्हापूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातील वरिष्ठ लिपिक शिवशंकर बिराजदार यांचा सत्कार जिल्हा ग्रंथालय संघाचे कोषाध्यक्ष राम मोतीपवळे यांनी केला. राम मेकले यांनी नविन अधिकाऱ्याचे स्वागतपर व संजय मस्के यांच्या कार्याचा गौरवपर मनोगत व्यक्त केले. वंदना काटकर ...पान ६ वर